मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ८ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक ८ ● वर्ष १५ वे ● पृष्ठे ५२ ● ऑगस्ट २०१८






संपादक
**राजेंद्र थोरात**

सहसंपादक
**सुरेश तिर्लोटकर**

सजावट व चित्रे
**उदय सत्यवान पांगे** **राजनंदन पिंपळकर**

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४. येथे प्रकाशित केली.





## कथा


- इंद्राला कर्मभोग ०६
- देव भक्तासाठी धावतसे ०८
- खरा वारस १४
- हाथ फिरे तिथे लक्ष्मी वसे ३०
- खरा ज्ञानी ४२
- लोभाचा वार, तिथे मूर्खांचा..४४
- सारासार विवेक ४८



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org





| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९

## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- अमर हुतात्मा खुदिराम बोस ०५
- लघुग्रहांच्या विश्वात ०७
- तेजस्विनी -७६ २०
- दुर्गभ्रमंती २२
- जाणूया... मुक्ति पर्व ... २९
- समर्थ दर्शन -४६ ३४
- ओम प्रकाश मुंजाल ३५
- आपले जिल्हे ४०
- पक्षीजगत ४७








## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६





## कविता


- रक्षाबंधन २१
- तिरंगा अमुचा आम्हास... ४१

# उपवास

राजू शाळेतून घरी आला. आईने त्याला जेवायला वाढले. राजू म्हणाला, "आई, तू पण जेव ना माझ्यासोबत." आई म्हणाली, "आज माझा उपवास आहे."

"उपवास ? अगं आई काल तर तू उपवास केला होतास ना ?"

"हो, पण काल श्रावण सोमवार होता, महादेवाचा वार. आज मंगळवार, आज अंगारकी चतुर्थी आहे ना !"

"अगं आई, उपवास करुन शरीराला त्रास देऊन काय मिळणार आहे ?"

"बाळ ! उपवास केल्याने ईश्वराची कृपा होते. आपल्या मनातील इच्छा पूर्ण होतात."

आईच्या या उत्तराने राजूचे काही समाधान झाले नाही. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर त्याने आपल्या गुरुजींना प्रश्न विचारला, "गुरुजी, मोठी माणसं उपवास का करतात ?"

गुरुजी म्हणाले, "जसे आपण आठवड्यातून एक दिवस सुट्टी घेऊन विश्रांती घेतो तसे आपल्या पोटाला, त्यातील पचनेंद्रियांना विश्रांती नको का ? या दिवशी हलका आहार घ्यावा. वाणीला विराम द्यावा म्हणजे कमी बोलावे किंवा मौन राहावे. ईश्वराचे नामस्मरण करावे, त्यामुळे आपले मन-बुध्दी-शरीर ताजेतवाने होते."

गुरुजींच्या उत्तराने राजूचे समाधान झाले खरे; परंतु तरीही त्याच्या मनात एक प्रश्न रुंजी घालत होता. भीतभीतच त्याने विचारले, "गुरुजी, उपवास केल्याने देव खूश होतो व आपल्या इच्छा पूर्ण करतो का ?"

गुरुजी हसले व म्हणाले, "बाळ ! आपण सारी देवाची मुलं. आपल्याला उपाशी पाहून देव कसा बरं खूश होईल ? उपवास म्हणजे उपाशी राहणं नव्हे, उप म्हणजे जवळ आणि वास म्हणजे राहणे. उपवास म्हणजेच ईश्वराच्या जवळ राहणे. ईश्वराला आवडेल असे वागणे."

"...... पण मग गुरुजी श्रावणात तर खूप सारे उपवास येतात. शिवाय मांसाहार देखील कोणी घेत नाही."

"खरंय ते ! यामागे शास्त्रीय कारण देखील आहे. श्रावण महिन्यातलं वातावरण अन्नपचनाला पोषक नसतं. भरपूर आणि जड आहार घेतल्यानं अपचन, वात-पित्त यासारखे आजार होतात म्हणून हलका आहार घ्यावा किंवा एकवेळ पोटाला आराम द्यावा. आता प्रश्न आहे मांसाहाराचा. मांसाहार हा देखील पचायला जड आहे. शिवाय श्रावणात माशांची मादी समुद्रात अंडी घालतात. अशा स्थितीत मासेमारी केली तर माशांची पैदास होणार नाही म्हणून आपल्या ऋषी-मुनींनी मांसाहार वर्ज्य सांगितला असावा. या महिन्यात पालेभाज्याही भरपूर पिकतात. त्यांचे सेवन करुन क्षार-जीवनसत्त्वे-खनिजे यांचीही पूर्तता होते." गुरुजींच्या उत्तराने राजूचे पूर्ण समाधान झाले.

राजू शाळेतून घरी गेला. दुपारी न जेवता भर उन्हात उभा राहिला. त्याला पाहून आई म्हणाली, "बाळा, असा उन्हात का उभा राहिलास ? जेवून घे." राजू म्हणाला, "आई, तूच माझा देव आहेस म्हणून मी शरीराला त्रास देऊन तुला प्रसन्न करुन घेणार आहे, म्हणजे तू मला एक खेळणं घेऊन देशील."

आई म्हणाली, "अरे वेड्या, माझ्याकडे प्रेमानं मागितलं असतं तर मी तुला दिलं नसतं का ? त्यासाठी उगाच स्वत:ला त्रास का करुन घेतोस ? तुला त्रास झालेला मला कसा बघवेल ?"

त्यावर राजू म्हणाला, "आई, आपण सारी देवाची लेकरं आहोत ना ? मग तू सतत उपवास करुन स्वत:ला त्रास का करुन घेतेस ? देवाला ते आवडेल का ? तूही मग देवाकडे प्रेमाने का नाही मागत ?"

राजूच्या प्रश्नाला आईकडे उत्तर नव्हतं. कौतुकाने त्याला जवळ घेत आई एवढीच म्हणाली, "एवढं शहाणपण कुठून मिळवलंस रे बाळा ?"

- राजेंद्र थोरात

# अमर हुतात्मा खुदिराम बोस



आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. हुतात्मा खुदिराम बोस हे त्यातील एक मुख्य नाव. खुदीराम बोस यांचा जन्म ३ डिसेंबर १८८९ रोजी बंगालमधील हबीबपूर गावी झाला. मिदनापूरमध्ये शिक्षण घेत असताना १९०३ साली ब्रिटीश शासनाच्या क्रौर्याविरुध्द त्यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला होता. १९०५ च्या वंग-भंगानंतर जे जनआंदोलन झाले त्यापासून बंगालमधील एकही गाव मागे राहिले नव्हते. याच काळात खुदीराम यांची सत्येन बोस यांच्याशी भेट झाली आणि त्यांनी स्वतःला स्वातंत्र्यासाठी वाहून घेतले. शिक्षण सोडून ते सत्येनजींच्या हॅण्डलूम फॅक्टरीत काम करु लागले. ते त्या काळातील स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र होते. इथेच खुदीराम शस्त्र चालवण्यात तरबेज झाले. १९०६ साली मिदनापूरच्या शेती व औद्योगिक मेळाव्यात देशजागृतीसंबंधित सोनार बांगला पत्रके वाटताना ते राजद्रोहाच्या अपराधाखाली पकडले गेले. परंतु शिपायाला जखमी करुन ते निसटले.

खुदीराम बोस यांनी १९०७ साली मिदनापुरातील मवाळ दलाचे नेते सुरेंद्रनाथ बॅनर्जी विरुध्द लागलेल्या निकालाच्या निषेधार्थ निघालेल्या मिरवणुकीत भाग घेतला आणि स्वातंत्र्यासाठी मवाळ धोरण स्वीकारण्यापेक्षा क्रांतिकारक विचार उपयुक्त मानले. १९०८ साली युगांतर दलाचे नेते वारिंद्र घोषांनी मुजफ्फरनगरच्या किंग्जफोर्ड या सत्र न्यायाधीशाने कोलकात्यात केलेल्या अमानुष अत्याचाराचा बदला घेण्यासाठी प्रफुल्ल चाकीसोबत खुदीराम बोस यांची निवड केली. त्या दोघांनी एका वाहनाला किंग्जफोर्डची कॅरिज समजून त्यावर बॉम्ब फेकला. त्यामुळे ते वॅनी रेल्वे स्टेशनवर पकडले गेले. वंदे मातरमच्या घोषणा देत ११ ऑगस्ट १९०८ रोजी फासावर चढून खुदीराम हुतात्मा झाले.

खुदीराम बोस यांच्या हौतात्म्यासोबत भारताच्या स्वातंत्र्यातील अग्नियुग संपल्यासारखे झाले होते. लोकमान्य टिळकही खुदीराम यांचे प्रशंसक होते व खुदीराम बोस यांच्या क्रांतिकारी चळवळीविषयी केसरीत लिहिल्याबद्दल त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. कारण ते स्वतःही क्रांतिकारी मार्गानेच स्वातंत्र्य मिळवू इच्छित होते.

पौराणिक कथा

# इंद्राला कर्मभोग

देव-दानवांचे युद्ध सुरु झाले. मेघनाद इंद्राशी युध्द करु लागला. इंद्राला उलट काहीच करता येत नव्हते. कारण मेघनाद सतत अदृश्य होत असे. अशा या कपटनीतीच्या युध्दाने इंद्र थकून गेला. याचा फायदा घेऊन मेघनादाने गलितगात्र इंद्राला मायेने जखडले व तो त्याला आपल्या पित्यापाशी घेऊन आला. रावणाला म्हणाला, "तात, आता युध्द चालू ठेवण्याची आपणाला गरज नाही. मी देवांच्या सेनेचा प्रमुख, तिन्ही लोकांचा स्वामी साक्षात देवराज इंद्रालाच कैद केलं आहे. देवांचे नाकच छाटले आहे!"

रावणाने मग आपल्या प्रिय पुत्राची मेघनादाची पाठ थोपटली. युध्द थांबवून व कैद केलेल्या इंद्राला उघड्या रथात बसवून वाजत-गाजत, मिरवतच त्यांनी त्याला लंकेत आणले. सारी देवसेना युध्द संपल्यामुळे इंद्राशिवायच हात हलवत परत गेली. रावणपुत्र मेघनादाने इंद्राला कैद केले व तो त्याला थेट लंकेला घेऊन गेला. हे जेव्हा प्रजापती ब्रह्मदेवांना कळले, तेव्हा ते स्वत:च मध्यस्थी करण्यासाठी पुढे आले. रावणापाशी जाऊन ते कोमल विनवणीच्या स्वरात बोलू लागले, "वत्सा रावणा, तुझा पुत्र मेघनाद याने अतुलनीय पराक्रम केला आहे. प्रत्यक्ष इंद्राला जिंकले म्हणून तो यापुढे 'इंद्रजित' या नावाने लोकविख्यात होईल."

"परंतु रावणा, आता मला एक सांग, इंद्राची सुटका करण्याच्या बदल्यात देवांनी तुला काय द्यावं?"

त्यावर इंद्रजित मध्येच तोंड खुपसून म्हणाला, "देवांना, जर इंद्राची सुटका हवी असेल, तर त्या बदल्यात मला अमरत्व मिळावे."

नकारार्थी मान हलवीत ब्रह्मदेव म्हणाले, "मर्त्यलोकातील कुणीही अमरत्व प्राप्त करु शकणार नाही. त्यात तूही समाविष्ट आहेस."

"ठीक आहे." इंद्रजित पुढे म्हणाला, "तर मग मला असा वर द्या, की युध्दासाठी जेव्हा मी जप-होम करीन, तेव्हा वेदाग्नीतून एक सुसज्ज रथ प्रकट होईल. त्या रथात आरुढ झाल्यावर माझा कुणीही पराभव करु शकणार नाही. लोक तपाने वरदान मिळवतात, परंतु मी माझ्या अतुल पराक्रमाने हे वरदान मिळवणार आहे!"

"एवम् अस्तु!" ब्रह्मदेव उद्गारले. त्यावर इंद्रजिताने इंद्राला बंधमुक्त केले व सर्व देव इंद्राला घेऊन स्वर्गलोकी आले.

तेव्हा इंद्राचे देवोचित तेज नष्ट झाले होते. तो दु:खी व संचित होऊन आपल्या पराभवाच्या कारणांचा शोध घेत होता. ब्रह्मदेवांनी त्याची मनोवस्था ओळखली व म्हटले, "देवराज, नीट आठवून पहा. नखशिखान्त सौंदर्यानं नटलेली एक मदनमंजिरी मी निर्माण केली. तिचं नाव अहिल्या. या अहिल्येविषयी इतर देवांप्रमाणे तुझ्याही मनात आसक्ती निर्माण झाली. पण मी ती स्वर्गतुल्य, देवस्वरुप कन्या महामुनी गौतमांना पत्नी म्हणून अर्पण केली. तेव्हा इंद्रा, मागचापुढचा विचार तू

विशेष

# लघुग्रहांच्या विश्वात

आपणा सर्वांना सूर्यमाला माहीत आहे. पण सूर्यमालेत फक्त ग्रहच आहेत का ? तर नाही. ग्रहांशिवाय इतर अनेक खगोल आहेत. खगोल म्हणजे काय ? तर ख म्हणजे आकाश आणि गोल म्हणजे गोलाकार. म्हणजेच खगोल म्हणजे आकाशातील गोलाकार वस्तू. सूर्यमालेतील लघुग्रह या खगोलांची माहिती या लेखांतून आपण करुन घेणार आहोत.

आपल्या सूर्यमालेतील मंगळ आणि गुरु या ग्रहांच्या दरम्यान भरपूर अशी रिकामी जागा आहे. या रिकाम्या जागेत लहान-लहान खगोलीय अवशेषांचा पट्टा निर्माण झाला आहे. या पट्ट्यातील अवशेषांनाच लघुग्रह असे म्हणतात. लघुग्रह देखील सूर्याभोवती परिभ्रमण करतात आणि दुर्बिणीतून दिसूही शकतात. म्हणजे लघुग्रह हे अवकाशात सूर्याभोवती फिरणारे सूर्यमालेतील लहान-लहान आकाराचे व कमी वस्तुमानाचे ग्रहच असतात. बुध, शुक्र, मंगळ, पृथ्वी इ. सूर्यकुलातील ग्रहांप्रमाणे अनियमित आकाराचे अनेक छोटे-छोटे ग्रह सूर्याभोवती विशिष्ट कक्षांवरुन प्रदक्षिणा करीत आहेत. उदा. ॲस्टेरॉइड, प्लॅनेटॉईड, मायनर, प्लॅनेट, सेरीस, पालास, हेबे, फ्लोरा, एरॉस इ. त्यांना लघुग्रह असे म्हणतात. यामधील बहुसंख्य लघुग्रह खडकाळ किंवा खनिज संपन्न असून त्यांच्या कक्षा मंगळ व गुरु या ग्रहांच्या कक्षांच्या दरम्यान आहे.


लहान ग्रहांच्या गटातील पृथ्वी सदृश्य मंगळ व त्यापुढे सुमारे ५५ कोटी किमी अंतरावरील मोठा ग्रह गुरु यांच्या कक्षांच्या दरम्यान अवकाशात दुसरा ग्रह नसल्यामुळे ते रिकामे असल्याचे ज्योतीर्विदांच्या नजरेस आले होते. योहानेस केप्लर यांनाही ही उणीव जाणवली. दुर्बिणीचा शोध लागल्यानंतर २०० वर्षापर्यंत लघुग्रहांचे अस्तित्व माहीत नव्हते, कारण ते फारच लहान व अंधुक असल्यामुळे कमी-जास्त तेजाच्या असंख्य ताऱ्यांच्या घोळक्यातून लघुग्रहांना सहज टिपणे सामान्यपणे फार कठीण होते. ❑❑❑

---

केला नाहीस. कपट वृत्तीने रुप पालटून व गौतम ऋषींचे रुप धारण करुन तू त्या साध्वी अहिल्येचा फसवून भोग घेतलास. त्यामुळे महात्मा गौतमऋषींचा संसार उद्ध्वस्त झाला. अहिल्या अकारण पतित ठरली व तिला घोर तपश्चर्या करावी लागली. महात्मा गौतम ऋषींनीदेखील तेव्हा तुला शाप दिला होता. त्या सर्वांची फळे तुला भोगावी लागत आहेत. यातून उध्दार व्हायचा असेल तर तुला वेगळी तपःसाधना करावी लागेल!”

ब्रह्मदेवांच्या बोलण्याने नामुष्की पत्कराव्या लागलेल्या इंद्राला थोडा धीर व दिलासा मिळाला.

❍ क्रमशः



कथा : रंजना भांगरे (मुलुंड-मुंबई)

# देव भक्तासाठी धावतसे

सकाळचे आठ वाजले होते. राधाच्या मुलाला दम्याचा ॲटॅक आलेला होता. त्याला श्वास घ्यायला अतिशय त्रास होत होता. मुलाला जवळच्या रुग्णालयात घेऊन जाण्याचे ठरवले. रुग्णालय घरापासून दोन किलोमीटर अंतरावर होते. त्याला लवकर नेले नाही तर गुंतागुंत वाढण्याची शक्यता होती; त्यामुळे तिने शेजाऱ्यांना विचारले. त्यांच्याकडे कार होती; पण त्यांनी सांगितले, की कारमध्ये पुरेसे पेट्रोल नाही. शेवटी तिने मुलाला उचलले आणि ती धावत रुग्णालयाकडे निघाली. पण मुलाचे वजन तुलनेने जरा जास्तच असल्याने त्याला उचलून घेऊन चालताना तिलाच धाप लागत होती. शेवटी कसेबसे ती पाय ओढत चालली होती. बहुतेक

लोक आपापल्या ठिकाणी पोचण्यासाठी निघाले होते. काही जणांचे तिच्याकडे लक्ष होते; पण कुणाकडेही तिला मदत करण्यासाठी वेळ नव्हता. तिने काही जणांना थांबवण्याचा प्रयत्न केला. वाहनांना हात केला पण तिचे प्रयत्न व्यर्थ ठरले. ती पाय ओढत रुग्णालयाकडे चालत होती. मुलाची अवस्था आणखी गंभीर होत चालली होती. तिची अस्वस्थता वाढत होती. तिला रस्त्यात फिरणारी एक व्यक्ती समोर दिसली. लोकांनी त्याला वेडा ठरवले होते. तो धावत तिच्याकडे आला. काय केले पाहिजे हे त्याला उमगले होते. तिने त्याला हॉस्पिटलमध्ये न्यायचे एवढेच सांगितले. त्याने मुलाला तिच्या हातून घेतले आणि तो धावतच निघाला. तो तिला एवढेच म्हणाला, ऑल विल बी वेल. तो मुलाला घेऊन येत असल्याचे पाहून हॉस्पिटलमधील स्टाफ आणि डॉक्टर सावध झाले. त्यांनी लगेचच त्या मुलावर उपचार सुरु केले. नंतर वीस मिनिटांनी राधा तिथे धापा टाकत पोचली. डॉक्टर तिला म्हणाले, मुलगा आणखी ५ मिनिटे जरी उशीरा आला असता तर त्याचे प्राण वाचवणे शक्य झाले नसते. तुमची संकटातून सुटका करण्यासाठी देव कधीही कुठला गुरु, बिशप, मौलवी, बाबा-बुवा यांची निवड करत नाही, तर तो तुमच्यापर्यंत सामान्य माणसाच्या रुपात पोचतो.

तुमच्या मार्गात कितीही अडचणी येवोत, कितीही संकटे आली तरी लक्षात ठेवा, तुमच्या आयुष्याची दोरी ईश्वराच्या हातात असते. तुमच्याविषयी त्याच्या मनात नेहमी चांगली भावना असते. संकटातून बाहेर पडण्यासाठी तुम्ही किती प्रयत्न करता हे तो पाहत असतो. तुम्ही ९५ टक्के ताकद लावली की उरलेली पाच टक्के ताकद लावून तुम्हाला संकटातून बाहेर काढण्यासाठी तो कुणाच्या तरी रुपाने येतो. म्हणून प्रथम प्रयत्नांना प्राधान्य द्या. ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवा. देव तर आपल्याच जवळ असतो. सद्‌गुरुच्या कृपेने, ज्ञानदृष्टीने या ईश्वराला आपण पाहतही आहोत. फक्त हाक मारण्याची गरज आहे. तो केव्हाही आपल्या मदतीसाठी धावून येण्यासाठी तयारच असतो. मग तो कोणाच्या न कोणाच्या तरी रुपाने का होईना, आपल्यासाठी येत असतो. त्यासाठी मात्र विश्वासाची गरज आणि प्रयत्नांची जोड देण्याची!

सद्‌गुरु येत असे या जगती
सुखमय करण्याशी संसार।
सद्‌गुरु येत असे या जगती
केवळ करण्या परउपकार।

(सं.अ.वा.पद क्र.६७)


❒❒❒

भक्त हा विनम्र असतो. निरंकार, गुरु आणि साधसंगतवर त्याचा पूर्ण विश्वास असतो. तो कधीही असा अभिमान करत नाही की, मी फार सुंदर बोलतो, सुंदर गातो, सुंदर कविता करतो; उलट ही तर परमात्म्याची कृपा आहे. असे तो मानतो. हा प्रभू-परमात्माच मला बोलवणारा, गाऊन घेणारा आणि लिहून घेणारा आहे; मग अभिमान तरी कशाचा करायचा?

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# शब्दकोडे १६९

❍ पूजा अरोडा (रेवाडी-हरियाणा)




## आडवे शब्द

२. शिवरायांचे आध्यात्मिक मार्गदर्शक : समर्थ ................
५. सर्वात लहान दोन अंकी संख्येची दुप्पट
७. निरंकारी जगतात ........ पर्व दिवस ऑगस्ट महिन्याच्या पंधरा तारखेला साजरा करतात.
८. संधी करा - नर+ इंद्र
९. कर याचा समानार्थी शब्द
१०. सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह
११. नालंदा विद्यापीठाचा संस्थापक
१४. याच्या ड्रायव्हरला पायलट म्हणतात.
१६. मारुती ८०० एक प्रसिध्द भारतीय......आहे.
१७. मोर हा भारताचा ............ पक्षी आहे.
१८. दशमान पध्दतीचा शोध कोणत्या देशात लागला ?

## उभे शब्द

१. केस कापणारा
३. मोठे शहर, मुंबई ............ पालिका
४. भारताचा नेपोलियन असे कोणास म्हटले आहे ?
६. नारदाचे गुरु
१२. प्रतिष्ठा, शरीराचा एक भाग
१३. या भारतीय राज्याची राजधानी गांधीनगर आहे.
१४. प्रगती, उन्नती
१५. जालियनवाला बागेतील सभेवर गोळीबार करण्याचा आदेश देणारा जनरल ........

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारू या

**प्रश्न : प्रत्येक प्राणिमात्रात परमात्मा आहे, मग कुणी सुखी तर कुणी दुःखी का ?**

**उत्तर :** ज्याप्रमाणे एका नदीचे पाणी शेताला पुरविले जाते. त्या शेतात कलिंगडाचे वेल आहेत, कारल्याचे वेल आहेत, लिंबाची झाडं आहेत, मिरचीची रोपं लावलेली आहेत. पाणी जरी एकाच नदीचे असले तरी प्रत्येक फळाची चव एकसारखी असेल का ? नाही. कलिंगड गोड, कारले कडू, द्राक्षे गोड, लिंबू आंबट तर मिरची तिखट. पाण्यामुळे त्यांचे भरणपोषण झाले. प्रत्येक फळझाडांमध्ये पाणी आहेच; पण पाणी गुणधर्म बदलत नाही तर त्या-त्या झाडांच्या बियांमुळे फळांच्या चवी बदलल्या. परमात्मा ही शरीराला चालवणारी शक्ती आहे. प्रत्येकाचं कर्म हे बीज आहे. कर्मानुसार त्या-त्या प्राण्याला सुख-दुःख इ. भोग प्राप्त होत असतात.

**प्रश्न : मनुष्यजन्माचं मुख्य ध्येय साध्य कसे करता येईल ?**


**उत्तर :** मनुष्यजन्माचं मुख्य ध्येय आहे, मोक्ष किंवा मुक्ती. आपल्या प्रयत्नाने ही गोष्ट साध्य होणार नाही. त्यासाठी सद्‌गुरुची कृपा आवश्यक आहे. सद्‌गुरुची कृपा प्राप्त होण्यासाठी सद्‌गुरुवर दृढ विश्वास असणे गरजेचे आहे. ज्याचा विश्वास दृढ असतो, त्याच्यावर कृपा होत असते म्हणून मोक्षप्राप्ती ही कृपासाध्य आहे असे म्हटले जाते.

**प्रश्न : या सृष्टीत प्रत्येक वस्तू वेगवेगळी आणि वेगवेगळ्या गुणधर्माची आहे मग त्यात बदल होऊन त्या कुठे जातात ?**

**उत्तर :** या सृष्टीतील प्रत्येक वस्तू ही पाच तत्त्वांची बनलेली आहे. दिसायला ही तत्त्वे भिन्न-भिन्न दिसतात. पाणी आणि अग्नी एकत्र राहू शकत नाही. असे असले तरी ही पाच तत्त्वे निराकार परमात्म्यापासूनच बनलेली आहेत. त्यांचं मूळ उत्पत्तीस्थान निराकार परमात्मा आहे. ज्या काही घडामोडी घडतात त्या या ईश्वरामध्ये घडतात आणि निरंकार ईश्वरातच विलीन होतात. पाण्यापासून बर्फ बनते. ते पुन्हा पाण्यात विलिन होते. तसे निराकारापासून पाच तत्त्वे बनतात व अंती निराकारात विलीन होतात.

**प्रश्न : ज्ञान आणि ध्यान यात काय फरक आहे ?**

उत्तर : ज्ञानाने जिज्ञासा पूर्ती होते तर ध्यानाने पूर्णत्व प्राप्त होते. विद्यार्थी किंवा जिज्ञासू ज्ञानासाठी इच्छुक असतात तर शिष्य (गुरसिख) ध्यानासाठी इच्छुक असतात. नुसत्या ज्ञानाने अहंकार वाढतो तर ध्यानाने अहंकार समाप्त होतो. कारण ध्यान म्हणजे ईश्वराशी एकरुप होणे तर ज्ञान म्हणजे माहितीचा संग्रह करणे म्हणूनच गीतेत म्हटलंय - ज्ञानात ध्यानं विशेष्यते. ध्यानाने पूर्ण शांतीचा अनुभव येतो. ध्यान केव्हाही, कुठेही करता येते. ध्यान ही निर्विचार, निर्विकार व निर्विकल्प अवस्थेचं नाव आहे. जीवनाच्या पूर्णत्वासाठी ज्ञान आणि ध्यान या दोहोंची आवश्यकता आहे. ध्यानाशिवाय ज्ञान अपूर्ण आहे.



# शिकवण

जेव्हा मनात परमात्म्याच्या सर्व संततीविषयी प्रेमच प्रेम भरलेले असते तेव्हा दूरवर असलेले अंतरसुध्दा खूप दूर आहे असे वाटत नाही. आपण नेहमीच त्या ३६ वर्षांच्या कार्यकाळाची चर्चा करतो, जी बाबाजींनी केवळ संगत आणि मानवतेसाठी व्यतीत केली. आता आम्हा सर्वांचं कर्तव्य बनतं, की जे प्रेम, जी शिकवण बाबाजींनी आपल्याला दिली ती शिकवण आणि प्रेम जगाच्या कानाकोपऱ्यात प्रसारीत करु शकू.

त्यासाठी आपल्याला अहंकाराचा त्याग करावा लागेल कारण अहंकार सर्व समस्यांचं आणि

विनाशाचं कारण आहे. म्हणून आपण आपल्या अहंकाराला नेहमी दूर ठेवावे. अभिमान कशाचा? जर आपल्याला माहीत आहे, की आपण सारे मातीचे पुतळे आहोत, मातीचेच बनलेले आहोत मग कोणत्याही जातीचे, पंथाचे किंवा भाषेचे असोत, या मातीतच सर्वांना मिसळून जायचे आहे. हे जीवन सुध्दा निरंकारानेच दिले आहे, या जगातील ज्या भौतिक वस्तू आमच्याजवळ आहेत त्या आमच्यासोबत जाणार नाहीत, एक सुईसुध्दा जाणार नाही.

जगातून जातेवेळी जी काही आपली छाप सोडून जाऊ, त्यात हेच असेल, की इतर सर्व लोकांच्याशी आम्ही कसा व्यवहार केला? आणि आमचं मानवतेसाठी कोणतं योगदान होतं? आम्ही मनं तोडणाऱ्यांमध्ये आहोत, की तुटलेल्या मनांना प्रेमाने जोडत आहोत? आम्ही आग लावणारे आहोत, की लागलेली आग विझवणारे आहोत? हे सर्व आमच्यावर अवलंबून आहे.

बाबाजींची हीच इच्छा होती, की आम्ही दुसऱ्यांसाठी एक उदाहरण बनावे. निरंकाराने राहण्यासाठी आम्हाला हे सुंदर विश्व दिले आहे. आम्ही याला आपल्या नकारात्मकतेच्या कारणाने दुःखदायी का बनवावे? बाबाजींनी आपल्याला नेहमीच सकारात्मकतेशी जोडले आहे तरीसुध्दा आम्ही नकारात्मकता अंगीकारु तर ते निव्वळ आमच्यासाठीच नव्हे तर इतरांसाठीसुध्दा दुःखदायक होईल. म्हणून बाबाजींनी आपल्याला फक्त सकारात्मक भाव मनात धारण करण्याची शिकवण दिली आहे.

❏❏❏

## परमात्म्यावर विश्वास ठेवा

गुरुच्या मुखातून जो आदेश येईल त्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्याला जीवनाचं अभिन्न अंग बनविण्याची कोणतीच संधी गुरसिख हातातून जाऊ देत नाही. त्याचं असं ठाम मत असतं, की "पूरे का किया सब किछु पूरा!" गुरसिख सत्यवादी असल्यामुळे सद्‌गुरुच्या आदेशावर पूर्ण विश्वास ठेवतो आणि त्यानुसार जीवन बनविणे हे गौरवास्पद समजतो. आपल्याला पूर्ण सद्‌गुरु मिळाला आहे. त्याने आपल्याला नाम भांडार दिलेले आहे. आता तुम्हाला चिंता, संशय, इर्षा, अभिमान आणि क्लेषामध्ये फसायचे नाही. याचा केवळ एकच उपाय आहे, की आापण जिथे स्थिर झालो आहोत, तिथून डळमळीत होऊ नका. निरंकारावर दृढ रहा; जेणेकरुन चिंता जवळच येणार नाही. संतजनांनो, नेहमी प्रभु यश गा आणि प्रभुचे सेवक बनून राहा. ईश्वराला जाणणाऱ्यांच्या आत बाहेर ईश्वर आहे आणि ते ईश्वराचेच स्वरुप आहेत. त्यांच्यात आणि ईश्वरात काहीच फरक नाही. त्यांच्यातच ईश्वर विराजमान आहे हे पाहूनच त्यांची सेवा सत्कार करत राहायचे आहे.

**- युगपुरुष बाबा अवतारसिंहजी**



कथा

# खरा वारस

रामराव गावातील सज्जन गृहस्थ. अतिशय कष्टाने त्यांनी संसार उभा केला. थोडी शेतजमीन घेऊन ठेवली. दोन्ही मुलांची लग्नं लावून दिली. मुलीलाही चांगले स्थळ पाहून तिचंही लग्न गेल्याच वर्षी करुन दिलं. अचानक छोट्याशा आजाराचं निमित्त होऊन त्यांचं निधन झालं.

सारे नातेवाईक जमले. अंत्यविधीची तयारी सुरु केली. आता प्रेतयात्रा निघणार तोच एक व्यक्ती समोर उभी राहिली. त्या व्यक्तीने आपली ओळख सांगितली, "मी शामराव, शेजारच्या गावात राहतो. रामरावांचे जे जे वारसदार आहेत त्यांनी पुढे या. रामरावांनी माझ्याकडून दहा लाख रुपये एक वर्षापूर्वी उसने घेतले होते, ते मला परत केल्याशिवाय मी प्रेतयात्रा पुढे जाऊ देणार नाही." रामरावांची दोन्ही मुलं पुढे आली आणि म्हणाली, "बाबांनी दहा लाखाचं कर्ज घेतल्याचं आम्हाला

कधी सांगितलं नाही. आम्ही नाही देणार तुम्हाला पैसे!" रामरावांच्या भावांनीही कर्ज फेडण्यास नकार दिला. गावकरी, नातेवाईक हळूहळू तेथून काही ना काही कारण सांगून निघून जाऊ लागले. कोणीच जबाबदारी घेईना किंवा कर्ज फेडण्याची हमी देईना . बराच वेळ झाला होता. ही बातमी घरातील सर्व महिलांनाही समजली. एकच कुजबूज सुरु झाली. तेवढ्यात रामरावांची मुलगी बाहेर आली आणि हातातील पुडके शामरावांकडे देत हात जोडत म्हणाली, "काका, हे घ्या माझे दागिने, मंगळसूत्र, पाटल्या, बांगड्या. हे विकून जे पैसे येतील ते वळते करुन घ्या. राहिलेल्या कर्जाची पै न् पै मी परत करीन. सर्वांसमोर मी तुम्हाला शब्द देते; पण बाबांची प्रेतयात्रा अडवू नका." हा सारा प्रकार सगळे निमूटपणे बघत होते. कुणीही काही बोललं नाही. सारं वातावरण गंभीर झालं होतं. शामराव काय म्हणतात याकडे सर्वांचं लक्ष होतं. शामराव पुढे येत म्हणाले, "पोरी, धन्य आहेस तू! शामरावांच्या भाग्याचा मला हेवा वाटतो. बापाचं कर्ज आपल्या शिरावर घेऊन तू तुझे दागिने विकायला निघालीस. केवढं मोठं मन आहे तुझं. आपल्या वडिलांबद्दलचा आदर आणि प्रेम पाहून मी भारावून गेलो."

डोळ्यातील अश्रू पुसत शामराव पुढे म्हणाले, "पोरी तुझा बाप माझा मित्र होता. अडीअडचणीला त्याने मलाही खूप मदत केली. काबाडकष्ट करुन त्याने दोन्ही मुलांसाठी जमीन घेऊन दिली; पण बापाच्या डोक्यावरचं कर्ज पाहून ते पुढे आले नाहीत. वाटे, हिस्से मागायला मात्र पुढे येतील. पोरी, खरं म्हणजे तुझ्या वडिलांनी माझ्याकडून कर्ज घेतलंच नाही. उलट मलाच तुझ्या वडिलांचे दहा लाख परत करायचे आहेत. आता ही एवढी मोठी रक्कम कुणाकडे सोपवायची हा प्रश्न मला पडला होता. मला रामरावांच्या वारसाला हे पैसे द्यायचे होते. पण ही गोष्ट मी आधीच सांगितली असती तर सगळे वारसदार समोर येऊन उभे राहिले असते. खरा वारस मला सापडलाच नसता म्हणून मी ही उलटी चाल खेळलो, मला क्षमा कर."


"रामरावांचा खरा वारस तूच आहेस. उद्याच तुझ्या नावावर सारे पैसे जमा करतो." असे म्हणून शामरावांनी आपल्या मित्राला साश्रू नयनांनी भावपूर्ण निरोप दिला.

❑❑❑



निरंकारी मिशनचे सहावे गुरु म्हणून पूज्य भगिनी 'सुदीक्षाजी' यांना सद्‌गुरु माता सविंदर हरदेवजी महाराज यांनी आपल्या हस्ते तिलक लावून दिनांक १७ जुलै २०१८ रोजी गुरुपदी विराजमान केले व स्वतः गुरसिखरुपात राहणे स्वीकारले.

जयघोष - 'सद्‌गुरु माता सुदीक्षा सविंदर हरदेवजी महाराज की जय'




# आजोबा

*चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)*

*चित्रांकन –रंग : अजय कालडा*





कसला इमानदार आहेस रे तू ? चोर आत येत आहे तरी तू भुंकत नाहीस ? अरे मालकाला जागं कर.
तरीसुध्दा कुत्रा भुंकायला तयार नाही.
शांतपणे झोप. मालकाचं आपल्यावर लक्ष नाही; मग आपण तरी त्याच्यावर का लक्ष द्यायचं ? चोरी झाल्यावर कळेल.
अरे मूर्खा, चोर आत आला. तू तुझ्या कर्तव्याचं पालन कर. भुंकून मालकाला जागं कर.
तू भुंकत नाहीस तर, मालकाला मीच जागं करतो. मी मालकाचं नुकसान झालेलं पाहू शकत नाही.
मला माझं काम शिकवू नकोस ! तू गप्प बस.


कुत्र्याचं सांगणंदेखील गाढवाने ऐकलं नाही, ते जोरजोराने ओरडू लागले.
ढेंचू ...
धोब्याला जाग आली. अर्ध्या रात्री गाढवाचं ओरडणं ऐकून त्याला खूप राग आला आणि लाठी घेऊन त्याने गाढवाची चांगलीच पिटाई केली.
माझी झोप मोडलीस. खा मार आत्ता.


अरे, मेलो ! मालकाने खूप मारले.
धोबी झोपेपर्यंत चोर लपून राहिला आणि थोड्या वेळाने संधी पाहून चोरी करुन पसार झाला.
हे देवा! मी तर लुटलो गेलो. सगळे दागिने चोरीला गेले.
जेव्हा चोर चोरी करत होता तेव्हा तू भुंकला का नाही ?
मी तर मालकाला जागं करुन चोरी होण्यापासून वाचवायचा प्रयत्न करत होतो.
मित्रा, मला माफ कर. यापुढे मी अशी चूक पुन्हा करणार नाही, कर्तव्याचं पालन करीन.

# डॉ. लीला दीक्षित

बालसाहित्य हे संस्कारक्षमच असलं पाहिजे, असा काहीसा गैरसमज मराठीत रुढ झाला आहे. परिणामी बालसाहित्यातून सातत्याने उपदेशाचे डोस पाजण्याचं काम बालसाहित्य लिहिणाऱ्या लेखकांनी नित्यनेमाने केलं. मात्र मुलांवर संस्कार करतानाच, त्यांचं भावविश्व जाणून त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे, हे लीला दीक्षित यांच्यासारख्या मोजक्याच बालसाहित्यकारांना जमलं. मुलांशी संवांद करणं हाच ध्यास त्यांनी मानला. त्यामुळेच पोपटाचं झाड, बहाद्दर बल्लू, गाणारं झाड पंख नवे, गंमत गाव, नाचरे मोरया, मुके मित्र ही लीला दीक्षितांची पुस्तकं म्हणजे लहानांसाठी कायम जपून ठेवावा, असा ठेवा बनली. त्यांच्या पुस्तकातला निसर्ग तर मुलांचा मित्रच बनून गेला. ही किमया लीला दीक्षितांना साधली, ती कोकणातल्या गुहागरसारख्या निसर्गरम्य गावी त्यांचा जन्म झाल्यामुळेच. बालपणी अनुभवलेला कोकणातला निसर्ग, त्यांच्या पुस्तकांच्या केंद्रस्थानी उतरला आणि कायमचा लहानांचा होऊन गेला. छोट्यांसाठी लिहिताना एक काळजी घ्यावी लागते, त्यांच्याच वयाचं होऊन लिहावं लागतं. बालकथा लिहिणारा प्रत्यक्षात वयाने मोठा असला, तरी लिहिणाऱ्याचं कल्पनाविश्व बालवाचकांचं असावं लागतं, तरच बाललेखक आणि बालवाचकांचा मेळ जमतो. लीला दीक्षित आणि बालवाचकांचा असा मेळ कायमच जमला. मात्र लहान मुलांसाठी लेखन हेच लीला दीक्षितांचं कर्तृत्व नाही. त्यांचा एकूण आयुष्यपटच स्तिमित करणार आहे. वयाच्या १८ व्या वर्षी लग्न होऊनन त्या पुण्यात आल्या. नंतर त्यांनी एम.ए., पीएच.डीपर्यंतचं शिक्षण घेतलं. पुण्यातच एसएनडीटी महाविद्यालयात त्या मराठीच्या प्राध्यापक म्हणून रुजू झाल्या. मराठी हा अभ्यासाचा आणि आस्थेचा विषय असल्यामुळेच त्यांनी बालसाहित्याव्यतिरिक्तही विविध विषयांवर संशोधनपर लेखन केलं आहे. दहा समाजसुधारकांची रसाळ चरित्रं त्यांनी लिहिली असून, प्राचीन मराठी साहित्यातील स्त्रीचे दर्शन या त्यांच्या पुस्तकाला राज्यसरकारचा उत्कृष्ट वाडमयनिर्मितीचा पुरस्कारही मिळालेला आहे. असं असलं, तरी मुलाचं भावविश्व हेच त्यांनी आपलं कार्यक्षेत्र मानल्यामुळे बालसाहित्यकार हीच त्यांची ओळख बनली. बालसाहित्यातील त्यांचं कार्य लक्षात घेऊनच परभणीला झालेल्या अखिल भारतीय बालसाहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांना मानाने बहाल करण्यात आलं होतं. आजदेखील आपल्याकडून अजून चांगलं बालसाहित्य निर्माण होवो, हीच आस त्या बाळगून आहेत.

❑❑❑

कविता : सुरेश तिर्लोटकर

# रक्षाबंधन

रक्षाबंधन नाही बंधन
एक दिवसाचे
बहिणीचे नाते भावासाठी
अखंड आयुष्याचे ।।ध्रु।।



राखी मिळते बाजारी
हलकी आणि भारी
प्रेमाची ही राखी खरी
ती गाठ असे अंतरी
हे नाते ना धाग्यांचे ।।१।।

सुख दुःख एक दुजाचे
जाणवते ज्या हृदयांना
अशी दोन ती हृदये
असती बंधू भगिनींना
क्षण खरे मिलनाचे ।।२।।

धन दौलत ना कामाची
ही आस एक प्रेमाची
रक्षा बंधन नामाची
बंधू भगिनी मीलनाची
आजन्म जपायचे ।।३।।





# सांकशी किल्ला

रायगड जिल्ह्यातील पेण गावापासून १० किमीवर ८५० फूट उंचीचा सांकशी नावाचा एक छोटासा किल्ला आहे. किल्ल्यावर चढण्यासाठी पार करावे लागणारे दोन कातळ टप्पे व किल्ल्यावर असणारी भरपूर पाण्याची टाकी यामुळे या छोटेखानी किल्ल्याची भटकंती संस्मरणीय होते. सह्याद्रीची एक डोंगररांग खंडाळा घाटाच्या अलीकडे माणिकगडाच्या पश्चिमेला पसरलेली आहे. ही रांग उचत्तरेकडे पातळगंगा आणि दक्षिणेला बाळगंगा नद्यांची खोरी विभागते. यात बाळगंगा खोऱ्याच्या दक्षिणेला सांकशी डोंगरांग आहे.

## इतिहास :

सांक राजाने हा किल्ला बांधला. त्याला जगमाता नावाची मुलगी होती. राजा कर्नाळ्याच्या लढाईत मारला गेल्यावर त्याच्या मुलीने गडावरुन जीव दिला अशी दंतकथा आहे.

इ.स.१५४० मध्ये अहमदनगरच्या निजमशहाने हा किल्ला गुजरातच्या सुलतानाकडून जिंकून घेतला. त्यानंतर गुजरातच्या पोर्तुगिजांच्या मदतीने किल्ला परत जिंकून घेतला. निजामाचे सैन्य परत हल्ला करण्यासाठी येत आहे, हे पाहून किल्ला पोर्तुगिजांच्या हवाली करुन गुजरातचा सुलतान निघून गेला. निजाम सैन्याच्या वारंवार होणाऱ्या हल्ल्याला कंटाळून पोर्तुगिजांनी सांकशी व कर्नाळा किल्ला निजामाकडून विकत घेतला.

## पाहण्याची ठिकाणे :

दर्ग्याच्या बाजूने किल्ल्यावर चढायला सुरुवात केल्यावर १०मिनिटात आपण कातळात कोरलेल्या पायऱ्यांपाशी पोहोचतो. पायऱ्यांच्या उजवीकडे कातळात खोदलेली एक दोन खांबी टाकं आहेत. या टाक्यापर्यंत जाण्यासाठी कातळात खोदलेल्या पायऱ्यांनी जपून खाली उतरुन जावे लागते. पायऱ्या चढून

एका खिंडीपाशी पोहोचतो.गडमाथ्यावर जाणारी वाट या छोट्याश्या खिंडीतून जाते. येथील पायऱ्या नष्ट झाल्याने वर चढण्यासाठी कष्ट घ्यावे लागतात. सुरक्षेच्या दृष्टीने येथे ३०फूटी रोप वापरणे आवश्यक आहे. हा कातळटप्पा चढून वर पोहोचल्यावर उजवीकडे कातळात खोदलेली पाण्याची ३टाकी दिसतात. यांना "गाजीशाह टाके "म्हणतात. यापैकी शेवटच्या टाक्यात शिरण्यासाठी एक ३फूट × ३फूट दरवाजा कोरलेला आहे. या दरवाजाच्या चौकटीवर दोनही बाजूला किर्तीमुख कोरलेले आहेत. त्याखाली एके काळी व्दारपाल कोरलेले होते. आता फक्त त्याचे अवशेष दिसतात. बाजूला कातळात कोरलेली मारुतीची मूर्ती अस्पष्ट दिसते. या टाक्याचे दोन भाग केलेले आहेत. या टाक्यातील पाणी पिण्यायोग्य आहे.

पुढे सरळ चालत गेल्यावर आपल्याला एक कोरडे पडलेले टाकं दिसते. पुढे गेल्यावर कातळात कोरलेली दोन सुकलेली टाकी दिसतात. त्याच्या पुढे ६० फूट लांब ×४० फूट रुंद ×८ फूट उंच पाण्याचे खांब टाके पाहायला मिळते. ४ खांबांवर तोललेल्या या टाक्याचे वैशिष्टय म्हणजे याचा आतील उजव्या बाजूचा भाग, अर्धवर्तूळाकार कोरलेला आहे. किल्ल्याच्या पठारावर आल्यानंतर समोरच किल्ल्याची झेंड्याची टेकडी दिसते. ती टेकडी चढून गेल्यावर झेंडा व भग्न झालेले वाड्याचे अवशेष पाहायला मिळतात. अंदाजे ५० फूटावर एक गुहा दिसते. गिर्यारोहण तंत्राची माहिती असणे व साहित्य असणे आवश्यक आहे. दोन कोरड्या टाक्यांपासून पुढे किल्ल्याच्या दुसऱ्या भागात पठारावर ५ टाकी कोरलेली आहेत. पावसाचे पाणी वाहत टाक्याकडे जाण्यासाठी चर कोरलेले आहेत तर वाहात जाणाऱ्या पाण्यातील गाळ या खळग्यात साचत असे. टेहळणीसाठी बसलेल्या टेहळ्याला पाणी पिण्यासाठी उठून जायला लागू नये यासाठी अशा प्रकारचे खळगे जात. किल्ल्याच्या या टोकावर आल्यावर किल्ल्याची फेरी पूर्ण होते. संपूर्ण किल्ला फिरण्यास १ तास लागतो. किल्ल्यावरुन मणिकगड आणि कर्नाळ्याचे सुंदर दर्शन होते. नवीन आणि जूना असे दोन दर्गे दिसतात. किल्ल्यावर जाण्यासाठी या जुन्या दर्ग्याजवळ पोहोचायचे. तिथून समोरच एक वाट किल्ल्यावर गेलेली आहे.

पनवेलहून पेणकडे जाणाऱ्या मुंबई- गोवा महामार्गावर पनवेल पासून १५ किमी अंतरावर बळवली नावाचा फाटा आहे. या फाट्यावर उतरुन वीस मिनिटात बळवली गावात पोहोचतो. बळवली गावातील शाळेच्या जवळून एक वाट भेंडीवाडी मार्गे सांकशी किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या बुद्रुद्दीन दर्ग्यापाशी जाते. (हे अंतर साधारणतः६ किमी आहे.) ही वाट मातीची असल्याने स्वतःची गाडी किंवा बाईक यावरुन जाऊ शकते. अन्यथा आपली पायगाडीच सर्वात योग्य. बळववली गावातून दर्ग्यापर्यत जाण्यास दीड तास लागतो.

❒❒❒



# आरोग्य आणि सौंदर्यासाठी
# लोणी

पचन यंत्रणेचे वंगण असे लोण्याला म्हणतात. व्हिटॅमिन 'ए' आणि माफक प्रमाणात 'डी' व 'ई' व्हिटॅमिन लोण्यात असते. म्हणूनच सर्व वयोगटातील व आजारी लोकांना लोणी उपयुक्त ठरते.

भगवान श्रीकृष्णांनी अजरामर केलेले लोणी हे आरोग्य व सौंदर्य दोहोंसाठी अत्यंत उपयुक्त असते. त्यामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन 'ए' आणि माफक प्रमाणात 'डी' व 'ई' व्हिटॅमिन असते. १०० ग्रॅम लोण्यात ८१ टक्के स्निग्धता आणि २१५ मि. ग्रॅम कोलेस्ट्रॉल असते. कोणतीही बाह्यप्रक्रिया करावी लागत नाही (घुसळण्याशिवाय) हे वैशिष्ट्य ! सर्व वयोगटातील व आजारी लोकांना (हृदयविकारात माफक प्रमाण) हे उपयुक्त असते.


- लोणी हे अमृतसमान आहे. दररोज चमचाभर खाल्ल्याने लवकर म्हातारपण येत नाही.
- शीतल मधुर व पचनक्रियेस उपयुक्त असते. वर्षभर खाता येते.
- लोण्यामुळे डोळे थंड राहतात.
- हात-पायांत जळजळ होत असेल तर खडीसाखरेसह चमचाभर लोणी खावे.
- लोण्यामुळे बुद्धी, मेंदू, तरतरीत राहतो.
- अर्धशिशी (मायग्रेन) चा त्रास झाल्यास सूर्योदयापूर्वी चमचाभर लोण्यात चिमूटभर मिरीपावडर, खडीसाखरेसह खावी.
- मूळव्याधीचा त्रास असलेल्या रुग्णांना लोण्यामुळे आराम मिळतो.
- गरोदर महिलांनी रोज चमचाभर लोणी खाल्ल्यास गर्भ तेजस्वी व हुशार निपजतो.
- तोंड आले असता, लोणी चाटल्याने दाह कमी होतो.
- जुलाब होत असतील तर अवश्य सकाळ-संध्याकाळ १ किंवा २ चमचे लोणी खावे.
- ज्वारी-बाजरीच्या भाकरीबरोबर लोणी खाल्ल्याने अशक्तपणा जातो.

**सौंदर्य -**

- लोण्याच्या सेवनाने त्वचेचा शुष्कपणा दूर होतो.
- लोणी आणि मध एकजीव करुन चेहऱ्यावर लावल्यास सुरकुत्या पडत नाहीत. त्वचा मऊ राहते.
- अंड्याचा पांढरा भाग आणि लोणी एकजीव करुन हात, पाय, मान, गळा यांना लावल्यास वर्ण उजळतो. डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे जातात.
- टाचा, हाताचे कोपरे यावर लोणी व हळदीचा लेप दिल्याने तेथील निबर त्वचा मऊ पडते.
- बाळंतपणानंतर स्त्रियांच्या पोटावर लोण्याचा लेप दिल्यास व्रण नाहिसे होतात.
- पापण्यांवर लोणी लावल्यास त्या चमकदार होतात.
- रात्री झोपताना लोणी चेहऱ्याला लावावे. सकाळी उठल्यावर चेहरा कोमट पाण्याने धुवावा. डाग जातात, सुरकुत्या नष्ट होतात.
- हिवाळ्यात ओठांना लोणी लावल्याने ओठ फुटत नाहीत.

# आसन : अर्धवक्रासन

या आसनात शरीराचा वरचा अर्धा भाग वक्र वळतो आणि पाठीच्या कण्याला व स्नायूंना ताण दिला जातो. म्हणून या आसनाच अर्ध वक्रासन असे म्हणतात.



**कृती :** प्रथम दोन्ही पाय लांब पसरुन आसनस्थ व्हा. दोन्ही पाय समांतर ठेवा. नंतर उजवा पाय वाकवून डाव्या पायाच्या गुडघ्याजवळ ठेवा. आता डावा हात डाव्या पायाच्या गुडघ्यावर ठेवा आणि उजवा हात कमरेवर ठेवा. शरीर सरळ ठेवून कंबर पाठीमागे वळवा. ही स्थिती सहा ते आठ सेकंदापर्यंत ठेवा. हळूहळू श्वास घ्या. नंतर मूळ स्थितीत येऊन दुसऱ्या बाजूला वळून हे आसन करा. हे आसन रोज चार ते सहा वेळा करावे.

## फायदे :

- या आसनाचा परिणाम कंबर आणि पोटाच्या भागांवर होऊन ते बळकट होतात.
- स्त्री-पुरुषांच्या लैंगिक ग्रंथी या आसनामुळे कार्यक्षम होतात.
- या आसनामुळे पोट व कमरेची दुखणी कमी होण्यास मदत होते.
- या आसनामुळे बध्दकोष्ठ व पोटाचे इतर विकार बरे होतात.


❒❒❒

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!


आज्ञा मोहीते


अर्णव चौधरी


अस्मि तांडेल


अर्णव जोशी


गार्गी सुतार


गार्गी पाटील


हर्ष भाताब्रेकर


प्रत्यक्ष चव्हाण


रेवा कांबळे


समर काळे


रिध्दी जाधव


हर्ष धाडवे


अर्थव पाटील

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!


श्रावणी घोरपडे


श्रेया पाटील


सिया कदम


वेदांत पाठक


स्मर्णीका पवार


स्वयम जाधव


त्रिशा सावंत


वेदिका साळुंखे


सुदीक्षा घोडके


विनीत धिवार


श्रेया पवार


साई ढोबळे



# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : पेट्रोल कसे तयार करतात ?**

**उत्तर :** आज जगात पेट्रोल अत्यंत उपयोगी पदार्थ झाला आहे. बस, कार, स्कूटर, ट्रॅक्टर, विमान आणि जहाजे या सर्वात इंधन म्हणून पेट्रोलचा उपयोग होतो. प्रकाश व इतर ऊर्जाही आपणास त्यापासून प्राप्त होते. पेट्रोल पेट्रोलियमपासून प्राप्त होते. हे एक विष्यद आणि करड्या रंगाचे द्रव आहे. पेट्रोलियम हा शब्द पेट्रा म्हणजे खडक आणि ओलियम म्हणजे तेल या दोन शब्दांचा मिळून बनला आहे. पृथ्वीच्या गर्भातून पेट्रोलियम काढण्यात येते. लाखो वर्षापूर्वी भूमी खचल्यामुळे वनस्पती आणि प्राणी पृथ्वीमध्ये खूप खोल गाडले गेले. अति भयंकर दाब आणि उष्णता यामुळे अपघटित वनस्पतींचे आणि प्राण्यांचे रुपांतर पेट्रोलियममध्ये झाले. अगदी अलीकडील काळात मनुष्याला या साठ्यांचा शोध लागला आणि त्याने खडकामधून ते काढण्यास आरंभ केला.

पेट्रोलियमच्या विहिरीतून कच्चे तेल काढतात. त्यात पेट्रोल, नाफ्ता, मातीचे तेल, डिझेल, मेण, डांबर इत्यादी अनेक पदार्थ असतात. हे पदार्थ वेगळे करण्याकरिता व तेलाला शुध्द करण्यासाठी कच्चे तेल शोधून कारखान्यात नेतात. मोठमोठ्या रंभाकार भांड्यात कच्च्या तेलाला तापविले जाते. तेल असलेले निरनिराळे घटक निरनिराळ्या तापमानावर विलग होतात व त्यांना निरनिराळ्या नळ्यांद्वारे वेगळे केले जाते. यातील एक भाग पेट्रोल होय.

काही कृत्रिम प्रौद्योगिकेने शास्त्रज्ञांना पेट्रोलचे संश्लेषण करण्यात यश प्राप्त झाले आहे. पण ही पध्दती फार खर्चाची आहे. पेट्रोल जगातील अनेक देशांत सापडते. परंतु आखातातील देश अमेरिका आणि रशिया हे पेट्रोलचे मोठे उत्पादक आहेत. भारतात हे मुख्यत: आसाम आणि मुंबई येथे सापडते. तेल तथा नैसर्गिक गॅस आयोग अधिक तेलाचा शोध लावण्याच्या कामात कार्यरत आहेत.

**प्रश्न : आपल्याला असलेल्या बेंबीचे काम काय ?**

**उत्तर :** हा लहान मुलांना नेहमी पडणारा प्रश्न. आपण हाताने काम करतो, पायाने चालतो, नाकाने श्वास घेतो, सोडतो, तोंडाने खातो-बोलतो पण बेंबीने काय करतो ? बाळ जेव्हा आईच्या पोटात (गर्भात) असते, तेव्हा आईकडून त्याला अन्न, प्राणवायू मिळतो तो या बेंबीच्या मार्गाने. नाळेच्या सहाय्याने आई व बाळ परस्परांना जोडलेले असतात. बाळाच्या शरीरातील टाकावू घटक याच मार्गाने पुन्हा बाहेर टाकले जातात. जन्मानंतर याची आवश्यकता उरत नाही, म्हणून नाळ कापून टाकली जाते. बेंबी मात्र तशीच राहते.

❏❏❏

# जाणूया.... मुक्तिपर्व दिनाविषयी

मित्रांनो, आपल्याला माहितीच असेल, की १५ ऑगस्ट हा दिवस आपण स्वतंत्रता दिवस म्हणून साजरा करतो. ह्या दिवशी अनेक हुत्म्यांनी आपल्या प्राणाची आहूती दिली. तसेच निरंकारी मिशनमध्येही १५ ऑगस्ट दिवसाला अनन्य साधारण महत्त्व दिले जाते. बाबा अवतारसिंहजींच्या पत्नी आणि बाबा गुरबचनसिंहजींच्या मातोश्री जगतमाता बुध्दवंती कौरजी यांनी बाबा अवतारसिंहजींच्या खांद्याला खांदा लावून सेवा केली. त्यांनी जीवनात सदैव सेवेला महत्त्व दिले आणि सेवेला आपले लक्ष्य बनविले. त्यांनी कधीही एक गुरुची पत्नी किंवा गुरुची आई आहे, असे मानले नाही. तर त्यांनी एक गुरसिख म्हणूनच आपले जीवन व्यतीत केले. अशा सेवामूर्ती जे १५ ऑगस्ट १९६४ रोजी आपल्या नश्वर शरीराचा त्याग केला. त्यांच्या सेवेची प्रेरणा म्हणून १५ ऑगस्ट १९६५ पासून या दिवसाला निरंकारी जगतात 'जगतमाता' दिवस असे नाव दिले गेले.

तसेच तुम्हाला हे देखील माहिती आहे का? जगतमाता बुध्दवंतीजींना 'जगतमाता' का म्हणतात? कारण त्यांनी त्यांची ममता व शिकवण ही केवळ स्वतःच्या मुलांपर्यंत सिमित न ठेवता. प्रत्येकाला त्यांनी भरभरुन प्रेम दिले. म्हणूनच बाबा बुटासिंहजींनी त्यांना 'जगतमाता' ही संज्ञा दिली. तसेच १५ ऑगस्ट या दिवशी बाबा अवतारसिंहजीच्या स्मृतींनाही आठवले जाते. १५ ऑगस्ट १९७९ रोजी संत लाभसिंहजी ब्रह्मलीन झाले. जे संत निरंकारी मंडळाचे प्रथम प्रधान होते. त्यांच्या सेवेचीही प्रेरणा घेतली जाते. १९७९ सालापासून १५ ऑगस्ट ह्या दिवसाला मुक्ति पर्व हे नाव देण्यात आले.

१९७९ ते २००२ सालापर्यंत गुरुपूजा दिवस आणि मुक्तीपर्व दिवस एकत्रितपणे साजरा केला जात होता. २००३ पासून २३ फेब्रुवारीला गुरुपूजा दिवस आणि १५ ऑगस्टला मुक्ती पर्व दिवस साजरा केला जाऊ लागला.

१५ ऑगस्ट हा दिवस जगतमाताजी आणि शहनशाहजी यांच्या सेवेच्या प्रेरणेबरोबरच आपलं संपूर्ण जीवन मिशनसाठी अर्पण करुन सत्यसंदेश आपल्या शब्दांतून आणि कार्यातून जगभरात पसरवणाऱ्या संत महात्म्यांच्या कार्यांची आठवण केली जाते. आपण त्यांचे कार्य 'संत निरंकारी ज्योति स्तंभ भाग १ व २', 'संत निरंकारी मिशन के अनमोल रत्न' आणि 'संत निरंकारी पत्र-पत्रिकांच्या' माध्यामातून वाचतो आणि प्रेरणा घेत असतो.

मित्रांनो, जर हा मुक्ति पर्व दिवस साजरा केला नसता तर काय झाले असते? असे, की आपल्याला हा सत्याचा संदेश कोनाकोपऱ्यात पोचवणाऱ्या संत महापुरुषांविषयी काहीच कळले नसते आणि त्यांच्या निष्काम सेवेची प्रेरणा मिळाली नसती. म्हणूनच अशा थोर संत महापुरुषांच्या सेवेविषयी जाणून घेऊन त्यांच्या सेवेची प्रेरणा घेऊ या.

**संग्राहक : अंकित चं. जाधव**



कथा

# हात फिरे तिथे लक्ष्मी वसे

एका गावात हिरामण आणि नारायण या नावाचे दोन शेतकरी राहत होते. दोघेही चांगले मित्र होते. हिरामण मोठ्या शेतजमिनीचा मालक होता तर नारायणाजवळ थोडी जमीन होती. पण नारायण त्यात संतुष्ट होता. एके दिवशी नारायण हिरामणकडे गेला तेव्हा हिरामण खूपच त्रस्त झालेला त्याला दिसत होता. त्याच्या घरात कुबट वास येत होता आणि घरातील सर्व सामानही अस्ताव्यस्त पडलेले होते. नारायणने हिरामणला त्याच्या चिंतेचे कारण विचारले तेव्हा तो म्हणाला, "मला काही समजत नाही, मनाला प्रसन्नता लाभतच नाही. शेतात गरजेपुरतं धान्यही पिकत नाही. असंच जर चालत राहिलं तर काही काळानंतर जगणंही मुश्कील होईल." नारायण हैराण होत म्हणाला, "तुझ्याकडे तर इतकी

उर्वरीत पान क्र. ४५ वर

# वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जावे



महापुरुषांची- संतांची वाणी आपल्याला सत्संगामध्ये नियमित ऐकायला मिळते. त्यातून आपल्याला चांगली शिकवण मिळते. जीवन जगण्याची कला प्राप्त होते. साधसंगत आणि गुरमत धारण करुन आपण जीवन जगलो तर खरोखर आपल्याला जीवन जगण्याची कला प्राप्त झाली असे म्हणता येईल. ती सुंदर कला खरोखर शोभायमान आहे. कल्याणकारक आहे. त्यामुळेच या संपूर्ण (जीवन) प्रवासाला किंमत आहे, महत्त्व आहे.


हीच प्रार्थना आहे, की दातार कृपा करो आणि सर्वांना शक्ती प्रदान करो, जेणेकरुन सर्वांनी आपल्यासमोर असणारी व्यापक लक्ष्यप्राप्ती करावी. आपण आपल्या मर्यादित विश्वामध्ये (संकुचित अवस्थेमध्ये) राहू नये. एका लहान गोष्टीसाठी मोठ्या कार्याचे नुकसान करु नये.

संत नेहमी स्वार्थभावाने रहीत होऊन कार्य करतात. आपल्याला प्रशंसा प्राप्त करण्यासाठी नव्हे, तर लक्ष्यप्राप्तीसाठी कार्य करायचे आहे. यालाच महत्त्व आहे. आपली प्रशंसा जरी होत नसली तरी देशाच्या प्रगतीमध्ये बरेचसे असे शांतकर्मी आहेत, ज्यांचे कधी कुठे नावही येत नाही. ते असे जगतात की त्यातून ते एक आदर्श छाप सोडतात. अशी जीवनशैली त्या सर्व संतांसाठी एक प्रेरणा बनते. त्यांच्या मनात ना प्रशंसेची भूक असते, ना त्यांना कोणत्या पदाची अपेक्षा असते. बोलणाऱ्याने आपल्या नावाचा उल्लेख करावा असे त्यांना वाटत नाही. ते तर केवळ प्रेमवश होऊन कार्य करत राहतात आणि त्यांच्या बदल्यात त्यांची काहीच अपेक्षा नसते.

देशाच्या प्रगतीसाठी जे आजही कार्य करतात, अशा शांत कार्यकर्त्यांचा आपण उल्लेख करतो. असाच कोणी सायकलवर एका गावाहून दुसऱ्या गावी, कच्च्या, चिखलाने भरलेल्या रस्त्याने, वादळ वाऱ्यात, अहंकारविरहीत होऊन लोकांना विचारतो, की आपण निरंकारी मिशनबद्दल ऐकले आहे का? अशाचप्रकारे ते गावोगावी निरंकारी मिशनची माहिती देत जातात आणि जेव्हा ते घरी परततात तेव्हा अंधार झालेला असतो. त्यांना आपल्या घराचेही स्मरण होत नाही आणि कसे तरी करुन सायकलने ते घरी पोचतात. परंतु अशा लोकांचे नाव आमच्या कोणत्याच प्रचारक किंवा प्रबंधक यादीत नाही. पण ते नेहमीच परमात्म्याच्या नजरेत आहेत. त्यांचे आपले अस्तित्व आहे, त्यांची आपली एक ओळख आणि किंमत आहे.

(सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या प्रवचनावर आधारित)


# हसा मुलांनो हसा



यमुनाबाई आपल्या मुलीसाठी स्थळ पहायला विवाहसंस्थेत गेल्या.
मॅनेजर : बोला, तुम्हाला कोणत्या टाईपचा मुलगा हवाय ?
यमुनाबाई : उंच आणि जास्त कमावणारा पाहिजे.
मॅनेजर : (फाईल दाखवत) ताई, हा मुलगा खूप जास्त कमावतो पण फक्त थोडा सावळा आहे.
यमुनाबाई : ह्याच टाईपमध्ये दुसरे कलर दाखवा ना !



एका बाईकवर प्रेस असे लिहिलेले असते. ट्रॅफिक पोलीस ती गाडी अडवतात.
ट्रॅफिक पोलिस : कोणत्या पेपरमध्ये काम करता तुम्ही ?
बाईकस्वार : नाही हो साहेब, लाँड्री आहे माझी. कपड्यांना इस्त्री करतो मी



गण्या : बाबा, बाबा, टीचरने उद्या शाळेत कुल्फी घेऊन यायला सांगितलं आहे.
गण्याचे बाबा : (दुसऱ्या दिवशी) टीचर, ही घ्या तुमच्यासाठी गारेगार कुल्फी. गण्याकडे पाठवली असती पण लहान आहे ना तो म्हणून मीच आलो.
टीचर : तुमचा मुलगा लहान आहे, हे मलाही माहीत आहे; पण तो बोबडा आहे, हे तुम्हालाही माहीत असायला हवं. मी त्याला स्कूल फी आणायला सांगितलं, कुल्फी नाही.



मंदी खूप शिष्ट आणि गर्विष्ठ मुलगी होती. आपल्या मैत्रिणींसमोर नेहमी बढाया मारत असे. एके दिवशी ती तिच्या मैत्रीणींसह शहरात फिरायला गेली होती. फिरुन झाल्यावर मैत्रिणींना सोडून मंदी एकटीच निघून गेली. मनीने तिला फोन केला.
मनी : अगं मंदे, कुठं आहेस तू ?
मंदी : मी माझ्या पप्पांच्या बी.एम्. डब्ल्यू. कारमधून शॉपिंग करायला चालले आहे. तुम्ही कुठं आहात साऱ्याजणी ?
मनी : तू ज्या टेम्पोत बसलीय ना त्याच टेम्पोत आम्ही पाठीमागं बसलो आहोत. टेम्पो थांबल्यावर भेटू.

बाळूकाका हॉस्पीटलमध्ये शेवटची घटका मोजत होते. कुटुंबातील सारे सदस्य त्यांची शेवटची इच्छा ऐकण्यासाठी उभे होते.

बाळूकाका : (मोठ्या मुलास) हे बघ मधू! आता मी काही जगू शकत नाही. तेव्हा मी तुला कर्वे रोडवरचे २५ फ्लॅट देतो. सोनू, तुला गोखले रोडच्या ५ इमारती, पिंकी तुला २० दुकानं घे आणि कमळे, तू माझी जीवनसाथी आहेस. माझ्या पश्चात तुला कुणाकडे पैशासाठी हात पसरायला लागू नये म्हणून मी तुला वरच्या आळीतले २५ बंगले देऊन जातो.

डॉक्टर : (कमळाबाईंना) तुम्ही खूप भाग्यवान आहात. तुमचे श्रीमंत पती जाताना एवढी सारी प्रॉपर्टी तुम्हाला देऊन चाललेत!

कमळाबाई : अहो, कसलं भाग्य न् कसली श्रीमंती! ते रोज सकाळी ह्या एरियात पेपरची लाईन टाकतात.

कंजूष काका : अगं, माझी कंबर खूप दुखतेय.... जरा शेजाऱ्यांकडून आयोडेक्स घेऊन येतेस का?

काकू : ते नाही देणार, खूपच कंजूष आहेत ते.

काका : हो ना, खानदानी कंजूष आहेत सगळे. मरताना काय सगळी प्रॉपर्टी घेऊन जाणार आहेत का? असं कर तू कपाटातून आपलंच आयोडेक्स काढ.

बाबा : काय बन्या, काय आला रिझल्ट?

बन्या : बाबा, १२ वी पास झालो. ८० टक्के मार्क मिळालेत.

बाबा : अरे वा! बघू....... अरे इथं तर ४० टक्केच दाखवलेत.

बन्या : प्रिंसीपल म्हणाले, आधार कार्ड लिंक झाल्यावर उरलेले ४० टक्के सबसिडीत जमा होतील म्हणून!

पती : (पत्नीला) काय गं, आज जेवण तुझ्या आईनं बनवलं का?

पत्नी : हो हो, तुम्ही कसं ओळखलं?

पती : रोज जेवणात काळे केस निघतात आज पांढरा केस निघाला.

# राज्यदान

एके दिवशी समर्थांनी माहुलीस स्नानसंध्या केली. नंतर करंजे गावात भिक्षा मागून साताऱ्याला माचीमध्ये भिक्षेला गेले. शिवाजी महाराज रायगडावर आहेत अशा समजुतीने ते वाड्यातही भिक्षेस गेले व जय जय रघुवीर समर्थ म्हणून गर्जना केली. शिवाजी महाराज नुकतेच येऊन वाड्यात बसले होते. त्यांनी समर्थांची बाणी श्रवण करताच त्यांचा कंठ सद्‌गतीत झाला आणि अशा सत्पात्राला कोणती भिक्षा घालावी असा विचार करुन लागलीच चिटणीसाला हाक मारुन "श्रीसमर्थचरणी सर्व राज्य अर्पण केले आहे" असे दानपत्र लिहून त्यावर शिक्कामोर्तब करुन ते समर्थांच्या झोळीत घातले.

हे पाहून समर्थांनी विचारले, "काय शिवबा, ही कशाची भिक्षा? मूठभर तांदूळ घातले असते तर दोन प्रहरची वेळ तरी भागली असती. आज आमची बोळवण कागदावरच करता की काय?" असे म्हणून तो कागद काढून वाचला. तेव्हा त्यात सर्व राज्य अर्पण केल्याचे लिहिले होते. ते पाहून समर्थांनी विचारले, "काय शिवबा, आम्हाला राज्य दिलेत, आता तुम्ही काय करणार?"


राजेश्री हात जोडून म्हणाले, "आपल्याच चरणसेवेत राहून कालक्रमणा करणार!"

हे ऐकून समर्थ हसले व म्हणाले, "उत्तम आहे, चलावे." असे म्हणून राजेश्रींना घेऊन भिक्षेला गेले. मग दोन प्रहरी वेण्णेच्या काठी जाऊन पानगे भाजून भोजन केले. नंतर वृक्षाखाली बसून शिवरायांना फार उत्तम उपदेश केला. त्यातील सारांश अशा - ज्याचे कर्म त्याने करणे हेच योग्य आहे. पाहिलेस ना आमच्या संगतीचे सुख? ह्याकरिता ह्या भरीस पडू नये. ब्राह्मणांनी स्नानसंध्या करुन व ज्ञान संपादन करुन असावे. क्षत्रियांनी क्षात्रधर्म पाळावा. यातच मोक्षप्राप्ती आहे. ज्याचे जे कर्म ते त्याने यथायोग्य रीतीने बजावणे हीच काय ती सर्व जन्मातील इतिकर्तव्यता आहे.

"पूर्वी रघुपतींनी आपल्या कुलगुरु वसिष्ठांना अर्धे राज्य अर्पण केले होते. त्यावेळी त्यांनीही त्यांना योगवासिष्ठरुपाने नीती, न्याय, धर्म सविस्तर सांगितला आणि त्यांचे राज्य त्यांना परत दिले. जनकानेही याज्ञवल्क्यास राज्य अर्पण केले होते. त्यावेळेस त्यांनीही त्यास राजधर्म सांगितला."

"ह्याकरिता आम्हा गोसाव्यांना तरी हे राज्य काय करायचे आहे? कदाचित घेतले तरी ते सांभाळायला प्रधान नको का? तोच तू हो आणि माझेच राज्य म्हणून संरक्षण कर म्हणजे झाले. प्रत्येक गोष्टीत सावधानता असावी, हे ध्यानात ठेव." असे म्हणून सावधानता या नावाचे पंचवीस ओव्यांचे एक प्रकरण त्यांना सांगितले. ते ऐकून शिवाजीराजांचे अंत:करण सद्गदित झाले व राज्य परत घेतल्याशिवाय गत्यंतर नाही अशी वेळ येऊन ठेपली. तेव्हा त्यांनी समर्थांना विनंती केली, "आता आपल्या पादुका तरी मजपाशी द्याव्यात. म्हणजे

# हिरो सायकलचे मालक : ओम प्रकाश मुंजाल



सायकलचे सुटे भाग विकण्याचा व्यवसाय ते स्वत:ची सायकल बनवणारी हिरो कंपनी अशी दैदिप्यमान वाटचाल करणारे ओम प्रकाश मुंजाल यांचा जन्म आताच्या पाकिस्तानातील कमालिया येथे २६ ऑगस्ट १९२८ रोजी एक छोटा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबात झाला. त्यांनी आणि त्यांचे भाऊ ब्रिजमोहन लाल, दयानंद आणि सत्यानंद यांनी १९४४ मध्ये सायकलीचे सुटे भाग विकण्याचा व्यवसाय अमृतसर येथे सुरु केला. पुढे मुंजाल कुटुंब लुधियानामध्ये स्थायिक झाले.

ओम प्रकाश यांना सायकलींचे सुटे भाग विकतानाच हे भाग स्वत: तयार करुन त्यापासून पुढे सायकल तयार करावी अशी कल्पना सुचली. त्याला मूर्त रुप देण्याचा ध्यास घेत १९५६ मध्ये हिरो सायकल्सची स्थापना केली. हिरो सायकलमुळे लुधियानाचे नाव आज जगभरात पोहोचले आहे. याशिवाय जगभरातील आघाडीच्या सायकल उत्पादकांमध्येही लुधियानाचे नाव समाविष्ट झाले आहे.

जीवन हाच आपला मोठा शिक्षक असतो आणि तीच जगातील सर्वात मोठी शाळा असते. मी माझ्या चुकांमधूनच शिकत गेलो आणि अडचणीमधूनच मार्ग काढत गेलो. असा एखादाच दिवस असेल, जेव्हा मी काही शिकलो नसेन, असे मुंजाल एकदा एका मुलाखतीत म्हणाले होते. त्यांना कवितेची आवड होती. काव्यपंक्ती स्वरचित असत. ओम प्रकाश मुंजाल यांनी १९५६ मध्ये वर्षभरात ६३९ सायकलींचे उत्पादन केले होते. आज ही कंपनी दिवसाला १८ ते २० हजार सायकलींचे उत्पादन करते. जगात सायकलींच्या उत्पादनात हे सर्वाधिक उत्पादन आहे.

कंपनीच्या वाटचालीची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने १९८६ घेतली होती.

❑❑❑

त्या स्थापन करुन मी आपले राज्य चालवीन.”

त्याप्रमाणे समर्थांनी आपल्या पादुका शिवरायांच्या हवाली केल्या. नंतर शिवरायांनी पुन्हा विनंती केली, “हे राज्य आपले आहे, माझे नव्हे, हे समजण्याकरिता काहीतरी त्यावर आपली निशाणी असावी.”

तेव्हा समर्थांची आज्ञा झाली, “आम्ही गोसावी आहोत. आमचे राजचिन्ह ते काय? भगवी वस्त्रे. ह्याकरिता आजपासून मराठ्यांचा झेंडा भगवा करावा.” त्याप्रमाणे राजांनी झेंडा भगवा करुन पुढे राज्यकारभार चालवला. नंतर समर्थांची स्वारी शके १५७४ मध्ये पुन्हा रामेश्वरास जाण्यासाठी निघाली.

❍ क्रमश:

# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा




मी मोटू, मौली, चिंटू यांना फोन करुन बोलवून घेते.
किट्टी, आम्ही सर्व आलो आहोत. चला बाहेर जाऊ.
वा ! काय मज्जा आहे पावसात भिजण्याची
मलाही पावसामध्ये भिजायला आवडतं पण मी नाही जाणार.
आपण जास्त वेळ पावसात नको राहायला नाहीतर आजारी पडू.


चला आपण सर्वांनी मिळून पाण्यात कागदाच्या होड्या सोडूया.


अरे! किट्टी तू हे काय करत आहेस ? मी पाण्यात पडेन, ना!


चिंटू! पाण्यात पडला. खूप मजा आली.


किट्टी, तू हे काय केलंस ? मला पाण्यात का पाडलंस ?
थांब, मी तुला आत्ता दाखवतो.
हे काय - मी तर पडले ना ?
धड़ाम!
किट्टी पाण्यात पडली मजा आली. किट्टी तुला तर शिंका यायला लागल्या.
मी तुला पावसात भिजू नको म्हणून सांगितलं होतं. तू माझं ऐकलं नाहीस आणि आता आजारी पडलीस.

# नंदुरबार

मुख्यालय :- नंदुरबार
क्षेत्रफळ :- ५,०३४ चौ. की. मी.
तालुके :- नंदुरबार, नवापूर,शहादा, तळोदा,अक्कलकुवा, धडगाव
नदया:- तापी ही प्रमुख नदी, रंगावली, पाताळगंगा,नेसू.
प्रमुख शेतकी उत्पादने :- भात, तूर,नागली,कपाशी,तुरडाळ,केळी,ऊस,मिरची आणि भाजीपाल्याची पिके.
थंड हवेचे ठिकाण:- तोरणमाळ.

### विशेष माहिती:-

१जुलै,१९९८ रोजी धुळे जिल्हयाचे विभाजन करण्यात येऊन नंदुरबार हा नवीन जिल्हा निर्माण केला गेला.

विभाजनापूर्वी धुळे जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ४०% इतके होते; ही लोकसंख्या आता नंदुरबार जिल्हयात एकवटली आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण आता ४०% हून जास्त झाले आहे. म्हणूनच आता नंदुरबार जिल्हयास 'आदिवासी जिल्हा'असे ओळखले जाते.

९ सप्टेंबर, १९४२ रोजी मोर्चाच्या अग्रभागी शिरीषकुमार मेहता हा बालक होता 'चले जाव'च्या घोषणेमुळे माथे भडकलेल्या इंग्रज सैनिकांनी केलेल्या गोळीबारात शिरीषकुमार मेहतासह अन्य मुले शहीद झाले. या घटनेमुळे नंदुरबारचे नाव देशभरात परिचित झाले. नंदुरबार शहरात शिरीषकुमार मेहताचे स्मारक आहे. नंदुरबार जिल्हयात पावरा, ढाणका,मावची,कोकणा,गावीत,धानका इ. आदिवासी जमाती बहुसंख्येने आढळतात.

❒❒❒


जिल्हा व सत्र न्यायालय,नंदुरबार.

# तिरंगा अमुचा आम्हास प्यारा

तिरंगा अमुचा आम्हास प्यारा
ठेवू तयाचा मान
त्याच्या छायेखाली नांदतो
सारा हिंदुस्थान ।।धृ।।

सन्मानाने उंच फडकवू
जनगण मन राष्ट्रगीत गाऊ
वंदन करुनी मस्तक नमवू
फडकवताना बिगुल वाजवू
वाढवू तयाची शान ।।१।।


तिरंग्याच्या करुन पताका
सभागृह मंडप ना सजवू
पताका न प्लॅस्टीकच्या बनवू
पायाखाली कधी न तुडवू
ठेवू सर्वांनी भान ।।२।।

सायंकाळी उतरविताना
वाजवायचा बिगुल पुन्हा
हलकेच तयाची घडी करावी
घडी तयाला पडू न द्यावी
जपून ठेवा ध्यान ।।३।।

स्वातंत्र्याच्या ध्वजासाठी
दिली कितीकांनी आहुती
फासावर लटकले किती
अमर राहिली त्यांची कीर्ती
ज्यांनी दिले बलिदान ।।४।।



कविता : सुरेश तिर्लोटकर



कथा

# खरा ज्ञानी

एका नगरीत भूपती नावाचा एक जिज्ञासू मुलगा राहत होता. बालपणापासून नवनवीन गोष्टी शिकण्याची त्याला भारी हौस होती. बासरी बनवणे असो, घर बांधणे असो, मडकी तयार करण्याचं काम असो. प्रत्येक कला तो शिकून घेई. त्याच्या या गोष्टीचं सर्वांनाच कौतुक वाटे. कुठलंही काम असो आपण ते सहज करु शकतो असा त्याचा आत्मविश्वास होता. हळूहळू आत्मविश्वासाची जागा आत्मप्रौढीने घेतली. त्याला आपल्या ज्ञानाचा, कला कौशल्याचा अभिमान व गर्व झाला. योगायोगाने त्या नगरीत भगवान बुद्धांचे आगमन झाले. भगवान बुद्धांबद्दल जाणून घ्यायची जिज्ञासा भूपतीच्या मनात निर्माण झाली. शिष्यांकडून त्याला कळलं, की बुद्ध फार मोठे

ज्ञानी आहेत. हे ऐकून त्याच्यातला अहंकार जागा झाला. ज्ञानी तर आपण आहोत. आपल्याला सगळ्या कला अवगत आहेत, मग हा कोण आला आपल्यापेक्षा मोठा ज्ञानी ? त्याला काही राहवेना. दुसऱ्या दिवशी तो सकाळी लवकरच भगवान बुद्धांकडे गेला व त्यांना विचारले, "तुम्हाला कोणकोणत्या कला येतात ?" त्यावर भगवान बुद्ध शांतच राहिले. ते फक्त त्याच्याकडे पाहून हसले. त्याने बुद्धांपुढे आपल्या साऱ्या करामतींची , कर्तृत्वाची गाथा मांडली. आपल्या हुशारीचे, ज्ञानाचे लोक कसे कौतुक करतात ते सांगितले. बराच वेळ सांगून झाल्यावर तो म्हणाला, "यापेक्षा आणखी कोणती वेगळी कला तुम्हाला येते ?" भगवान बुद्ध म्हणाले, "तुला जे काही येतं त्यापैकी मला काहीही येत नाही."

"मग तुम्हाला लोक ज्ञानी का म्हणतात ?"

"ते मला माहीत नाही; हो पण एवढं मात्र खरं, की मी स्वतःला नियंत्रणात ठेवू शकतो."

"ते कसे काय ?"

"माझी कुणी स्तुती केली म्हणून मला खूप आनंद होत नाही आणि निंदा केली तरी दुःख होत नाही. स्वतःच्या मनावर नियंत्रण जो ठेवू शकतो कदाचित त्यालाच लोक ज्ञानी म्हणत असावेत. खरं तर स्तुती आणि निंदा या दोन्हीमध्ये संयम राखणे हे ज्ञानी असल्याचं लक्षण आहे."

"त्यात काय एवढं कठीण आहे. मी देखील ज्ञानी होऊ शकतो." असे म्हणून भूपती बुद्धांकडे तुच्छतेने पाहत निघून गेला.

बुद्धांनी जाणले, की याला आपल्या ज्ञानाचा अहंकार झाला. त्यांनी आपल्या दोन-तीन शिष्यांना त्याच्यामागे पाठवले व काय-काय करायचे ते समजावून दिले.

भूपतीला पाहून एक शिष्य म्हणाला, "वा ! काय तुमची बुद्धिमत्ता, काय ते ज्ञान...." अशी बरीच स्तुती केली. आपली स्तुती ऐकून भूपती खूप खूश झाला. पुढे गेल्यावर दुसरा शिष्य भूपतीजवळ येत म्हणाला, "भगवान बुद्धांपेक्षा श्रेष्ठ कोणीच नाही. भूपती तर त्यांच्यापुढे एखादा पालापाचोळा आहे. भूपती अजून कच्चा आहे." आपली चाललेली निंदा भूपतीला सहन झाली नाही. तो दुसऱ्या शिष्याला मारायला धावला. शिष्य निघून गेले. भूपतीला बुद्धांचे शब्द आठवले. स्तुती आणि निंदा या दोन्ही गोष्टीत संयम राखणे हेच खरे ज्ञानी असल्याचे लक्षण आहे. परंतु तो पुन्हा ती गोष्ट विसरुन जाई.

भूपतीने आठ-दहा दिवस स्वतःवर संयम ठेवण्याचा प्रयत्न केला; पण त्याचे क्रोधावर नियंत्रण राहात नसे. शेवटी बुद्धांना तो शरण आला. बुद्धांनी त्याला अनुग्रह देऊन साधना शिकवली. तेव्हा त्याला कळून चुकलं, की भौतिक विद्या संपादन करुन कोणीही ज्ञानी होऊ शकत नाही. या जगात अफाट ज्ञान आहे. त्यात आपण कणभरही ज्ञान मिळवलं नाही आणि व्यर्थ अभिमानात राहिलो.

**तात्पर्य :** सुख-दुःख, यश-अपयश, लाभ-हानी, स्तुती-निंदा या गोष्टींनी जो प्रभावित होत नाही. प्रत्येक स्थितीत समतोल साधून राहतो तीच व्यक्ती खरी ज्ञानी. तोच सदैव आनंदात राहू शकतो.



कथा : विनोद अधिकारी (भूजलतज्ज्ञ)

# लोभाचा वार, तिथे मूर्खांचा बाजार

एका गावात एक दुर्जन होता. तो लोकांना हातोहात फसवून पैसे कमवत असे. एकदा मात्र तो फसवणूक करताना पकडला गेला. लोकांनी त्याला पकडून एका झाडाला बांधून ठेवले. गावाचा कोतवाल आला. त्याने त्याला शिक्षा फर्मावत सांगितले, या बदमाशाला संध्याकाळी येऊन समुद्रात बुडवून टाका. संध्याकाळी याला बुडवायचे आहे, तेव्हा आपण कामावर जाऊन येऊ, मग याला बुडवू असं ठरवून गावकरी आपापल्या कामाला निघून गेले. आता या संकटातून कशी सुटका करुन घ्यावी ? असा विचार करीत तो दुर्जन उपाय शोधत राहिला. शेजारच्या गावचा एक मेंढपाळ मेंढ्या घेऊन चालला होता. त्याने विचारलं, "भाऊ, कुणी तुला हे असं बांधून ठेवलंय ?" भोळ्या भाबड्या मेंढपाळाला पाहताच त्या दुर्जनाची विचारचक्रे फिरु लागली. त्यानं दु:खी स्वरात सांगितलं, "मी या गावातील

लोकांकडून पैसे घेण्यास नकार दिला म्हणून त्यांनी मला असं बांधून ठेवलंय!" मेंढपाळ गोंधळला, पैसे घ्यायला नकार दिला म्हणून इथं हे असं बांधून ठेवलय? तेव्हा दुर्जन म्हणाला, "काय सांगू, हे लोक मला लाच देत आहेत." "कशाबद्दल?" "मी या गावात गुप्तधन लोकांना मिळवून दिलं. आता मी हे काम लोकांच्या कल्याणसाठी केलं. त्याचा मोबदला घेऊन मी माझं पुण्य वाया का घालवू? मी त्यांना नको म्हटलं तरी ते ऐकत नाहीत. जबरदस्तीने मला पैसे देतायेत!"

हे ऐकताच मेंढपाळ म्हणाला, "ठिक आहे मित्रा, मी तुला सोडतो आणि मी तुझ्या जागी थांबतो!" तेवढेच आपल्याला फुकट पैसे मिळतील, या लोभाने तो मेंढपाळ त्या जागी उभा राहिला. संध्याकाळी सगळे कामावरुन परतले. लोकांनी त्याला दुर्जन समजून समुद्रात फेकून दिले. बिचारा मेंढपाळ फुकट मेला. दुसऱ्या दिवशी गावकरी शेतावर निघाले. तोच त्यांनी पाहिलं, गावाच्या वेशीतून तो दुर्जन हसत-हसत बऱ्याचशा मेंढ्या हाकत येत आहे. सगळेच चकीत झाले. ते म्हणाले, "आम्ही तर तुला पोत्यात बांधून समुद्रात फेकलं होतं!" तो म्हणाला, "तुम्ही मला समुद्रात टाकलं आणि तिथल्या देवांनी मला मेंढ्या बक्षीस देऊन पाठवलं. जे कोणी संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी या समुद्रात उडी मारतात त्या सर्वांना त्या देवता असंच बक्षीस देतात." हे ऐकताच सारे मूर्ख गावकरी समुद्राकडे धावत गेले, अन् त्यांनी समुद्रात उड्या मारल्या. शेवटी जे व्हायचं ते झाले. अति लोभ चांगला नव्हे, हा बोध त्या सर्वांना मिळाला; पण त्यासाठी त्यांना समुद्राचा तळ गाठावा लागला. म्हणतात ना, जिथे लोभाचा वार, तिथे मूर्खांचा बाजार.

❒❒❒

पान क्र. ३० वरुन

जमीन आहे. मग तुझे का हाल होत आहेत? तू माझ्या घरी चल. तिथून आपण दोघे एका तज्ज्ञाकडे जाऊ, ते तुला योग्य मार्ग दाखवतील." असे म्हणून दोघे नारायणाच्या घरी आले. नारायणाच्या घरी अंगणात येताच हिरामण चमकला, कारण अंगण स्वच्छ झाडून सडा रांगोळी केली होती, जनावरांचे गोठे स्वच्छ दिसत होते.

घरात फारशी सुबत्ता नसतानासुध्दा नीटनेटकेपणे घर आवरले होते. घरातल्या वस्तू व्यवस्थित ठेवून घर सुशोभित केले होतं. अगरबत्तीचा सुगंध दरवळत होता. अंगणात फुलझाडे फुलली होती. घरातील वातावरण शांत होते. हे दोघे येताच नारायणाच्या पत्नीने त्यांचे हसून स्वागत केले. त्यांच्या चहापाण्याची व्यवस्था केली. चहापाणी झाल्यावर नारायण व त्याची पत्नी हे दोघे हिरामणला सांगून काही काळ घरातील कामे करण्यात दंग झाले. कामे आटोपताच नारायण हिरामणला म्हणाला, "मित्रा! तुझ्या घरी येऊन माझे डोळे उघडले आहेत. आता मी सुध्दा तुझ्यासारखं वागण्याचा प्रयत्न करेन, तज्ज्ञाकडे जाण्याची गरज आता मला वाटत नाही, तू मला अशी शिकवण तुझ्या वागणुकीतून दिली आहेस. धन्यवाद मित्रा! चल निघतो मी. माझे घर आवरायला."

तात्पर्य : 'हात फिरे तिथे लक्ष्मी वसे' या म्हणीनुसार आचरण केल्यास मन प्रसन्न राहतं व यश प्राप्तीचा मार्ग दिसतो.

❒❒❒

# सामान्य ज्ञान



१) १६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन कोणता नवीन जिल्हा तयार झाला ?

अ) वाशिम ब) लातूर क) हिंगोली ड) रायगड

२) संत एकनाथांचे गाव कोणते ?

अ) आळंदी ब) पंढरपूर क) आपेगाव ड) पैठण

३) लोकांनीच आपला राज्यकारभार करणे याला काय म्हणतात ?

अ) जमीनदारी ब) राजेशाही क) लोकशाही ड) हुकूमशाही

४) राष्ट्रध्वजाच्या कोणत्या रंगाचा पट्टा वरच्या बाजूला असावा ?

अ) केशरी ब) पांढरा क) हिरवा ड) कोणत्याही

५) बालकवी हे टोपणनाव कोणाचे आहे ?

अ) कृष्णाजी केशव दामले ब) शं.के. कानेटकर

क) राम गणेश गडकरी ड) त्र्यंबक बापूजी ठोमरे

६) शरीराला प्रोटिन्सचा (प्रथिने) पुरवठा कशातून होतो ?

अ) डाळी ब) बटाटा क) साखर ड) तेल

७) आषाढी ते कार्तिक एकादशी या काळाला काय म्हणतात ?

अ) अधिकमास ब) चातुर्मास क) पुरुषोत्तम मास ड) पितृमास

८) बॉक्साइट या खनिजापासून कोणता धातू मिळतो ?

अ) लोखंड ब) जस्त क) निकेल ड) ॲल्युमिनिअम

९) १५ ऑगस्ट हा दिवस निरंकारी परिवारात कोणता दिवस म्हणून साजरा करतात ?

अ) मुक्तीपर्व ब) भक्तीपर्व क) गुरुपूजा ड) मानव एकता

१०) फिनलँड येथे झालेल्या जागतिक ॲथलेटिक चॅम्पियन स्पर्धेत ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदकाची मानकरी ठरलेली पहिली महिला धावपटू कोण ?

अ) पी.टी.उषा ब) हिमादास क) अपर्णा पोपट ड) आरती साहा

उत्तरे इतरत्र



# नकलाकार - लाफिंगथ्रश


हा हिमालयात आढळणारा पक्षी असल्याने याला मराठीत कोणतंही नाव नाही. या पक्ष्याला इंग्रजीत स्ट्रीकड् लाफिंगथ्रश असं म्हणतात. थंड हवेच्या प्रदेशात या पक्ष्याचं वास्तव्य दिसून येतं. नेपाळ, अफगाणिस्तान, पाकिस्तान हे हिमालयाच्या पर्वतरांगांपासून तिबेटपर्यंत हा पक्षी आढळतो.

साधारण चिमणीपेक्षा थोड्या मोठ्या आकाराचा हा पक्षी १८ ते २० सेंटीमीटर लांबीचा असतो आणि त्याचं वजन ३५-४६ ग्रॅम इतकं असतं. सफेद-तपकिरी अशी रंगसंगती असलेला हा पक्षी खूप गोंडस व आकर्षक दिसतो. याचा पाठीकडील व पंखाकडील भाग हा तांबड्या-तपकिरी रंगाचा असतो, तर पोटाकडील भाग व शरीराचा इतर भाग हा सफेद व फिकट रंगाचा असतो.

हिमालयात आढळणाऱ्या विशेष प्रजातींपैकी हा पक्षी असून, साधारणतः समुद्रसपाटीपासून १४००-३९०० मीटर उंचीवरील क्षेत्रातच आढळतो. या पक्ष्याची शारीरिक क्षमता जास्त असल्याने हा अतिशय थंड प्रदेशातही तग धरुन राहू शकतो. हा स्वभावाने लाजरा असला तरी मनुष्यवस्तीत याचं वास्तव्य दिसून येतं. यामुळेच सदाहरित जंगलं, दाट झाडी असणाऱ्या प्रदेशांबरोबरच शहरी बागा, पाणथळ क्षेत्र वा गावातील शेतीच्या प्रदेशातही हा आढळतो. हा समूहात राहणारा पक्षी असल्याने छोट्या-छोट्या थव्यांमध्ये दिसून येतो. एका थव्यात तीन ते सहा पक्षी आढळतात. वेगवेगळ्या प्रकारचे आवाज काढण्यात हा पक्षी तरबेज असतो. मात्र, हसल्यासारखा आवाज काढणं, हे याचं वैशिष्ट्य मानलं जातं. बारीक किडे, कीटक, अळ्या, गवताचे दाणे, बिया आणि फळं हे याचं मुख्य खाद्य आहे.

प्रजनन काळात नर व मादी दोघं मिळून घरटं बांधतात. दाट झाडीत, दगडाच्या कपाऱ्यांमध्ये किंवा एखाद्या घराच्या भिंतीमध्येसुध्दा याचं घरटं दिसून येतं. सुकलेली पानं, शेवाळ, मुळं वापरुन अव्यवस्थित आणि कोणताही विशिष्ट आकार नसलेलं घरटं तयार करतात. प्रजनन काळात मादी दोन ते चार अंडी घालते, बरेचदा कोकिळादेखील यांच्या घरट्यात स्वतःची अंडी घालते.

❒ संग्राहक : अंकित जाधव



कथा

# सारासार विवेक

अनेकदा अशा काही गोष्टी घडतात, की आपण माणसांची परिस्थिती समजून न घेता गैरसमज निर्माण करुन घेतो. त्याचा परिणाम समोरच्या व्यक्तीवर तर होतोच; पण स्वत:वरही होतो.

नंदू नावाचा गवळी शेजारच्या गावात दूध देण्याचं काम नित्यनेमाने करत असे. नंदूचा सगळीकडे एक लौकीक होता, की तो दुधात कधीही पाणी मिसळत नसे. आपला धंदा तो प्रामाणिकपणे करत असे. त्यामुळे ग्राहक त्याने आणलेलं दुधच आपल्या मुलांना पाजत असत.

एके दिवशी नंदू दूध द्यायला आला नाही. तसेच त्याच्या घरचंही कुणी आलं नाही. त्या दिवशी प्रत्येक घरातील मूल दुधावाचूनच राहिलं. त्याच

गावात एक सावकार राहत होता. तोच गावचा सरपंचही होता. सावकाराला दोन वर्षांचा मुलगा होता. त्या दिवशी त्यालाही दूध मिळालं नाही. नंदूने आणलेल्या दुधाव्यतिरिक्त कुठलंही दूध तो प्यायला नाही. आपलं मूल दूधाशिवाय उपाशी राहिलं याचा सावकाराच्या पत्नीला खूप राग आला. दुसऱ्या दिवशी जेव्हा नंदू सावकाराकडे दूध घेऊन गेला तेव्हा तिने त्याच्यावर खूप आगपाखड करायला सुरुवात केली. वाट्टेल तसे बोलून झाल्यावर तिने धमकावत सांगितलं, "उद्यापासून तू या गावात पाऊलदेखील ठेवायचं नाही, आम्ही दुसऱ्या गवळ्याकडून दूध घेऊ. गावात उद्यापासून दुसरा गवळी येणार."

नंदू गयावया करु लागला. आपली अडचण सांगण्याचा प्रयत्न करु लागला. पण त्याचं काहीही ऐकून घेतलं नाही. सावकाराचंही तिच्यापुढे काही चालेना.

दुसऱ्या दिवसापासून प्रत्येक घरातील मूल दुसऱ्या गवळ्याने आणलेलं दूध प्यायला नकार देऊ लागलं. नंदूला ही गोष्ट समजली. लहान मुलांचे हाल होऊ नये म्हणून तो एके दिवशी दूध घेऊन आला. प्रथम सरपंचाकडे गेला. त्याला पाहताच सगळे त्याच्याभोवती जमले. तो सगळ्यांना हात जोडून म्हणाला, "मायबाप हो, माझ्यामुळे तुमच्या लेकरांना उपाशी राहावं लागलं. त्यामुळे मी सर्वांची क्षमा मागतो; पण माझ्या चुकीची शिक्षा या लेकरांना देऊ नका. त्यांना उपाशी ठेवू नका. त्या लेकरांमध्ये मला माझा बाळ्या दिसतोय. माझा बाळ्या.... तीन वर्षाचं ते लेकरु हे जग सोडून गेलं हो. त्यामुळे तुमच्या लेकरांपर्यंत दूध घेऊन मला येता आलं नाही." नंदूचे ते शब्द उपस्थितांच्या कानात उकळते शिसे ओतल्याप्रमाणे शिरले. सर्वांना मोठा धक्काच बसला. सावकाराच्या पत्नीला आपल्या पायाखालची जमीन सरकते की काय असे वाटू लागले. तिने धावत जाऊन नंदूची हात जोडून क्षमा मागितली. रागाच्या भरात विचार न करता आपण नंदूला दोषी ठरवलं. सर्वांनीच नंदूची क्षमा मागितली.


नंदूनेही मोठ्या मनाने सर्वांना क्षमा केली आणि पुन्हा तो गावात दूध घेऊन येऊ लागला.

म्हणूनच म्हटलंय ना, बोलून विचारात पडण्यापेक्षा, विचार करुन बोलावे.

गुरुमताच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा महापुरुषांनी नेहमीच दिली आहे. मनमत आणि गुरुमत यांची तुलना सदैव होत आली आहे. मनमुख आणि गुरुमुखाची लक्षणेही सांगितली गेली आहेत. गुरुमताच्या मार्गावर चालणाराच परमार्थी असतो. गुरुमुख गुरुच्या आदेशाचे पालन करतो. गुरुने दिलेल्या आशीर्वादांचे महत्त्व जाणतो. त्यांनी दाखविलेल्या मार्गानेच जीवन जगतो. गुरुच्या मुखातून येणाऱ्या प्रत्येक वचनाला सत्वचन करतो. किंतु परंतु न करता वचनाचे पालन करतो.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) ड
३) क
४) अ
५) ड
६) अ
७) ब
८) ड
९) अ
१०) ब

## श ब्द को डे १६९

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| न्हा | | रा | म | दा | स | |
| वी | स | | हा | | मु | क्ती |
| | न | | न | रें | द्र | |
| हा | त | | ग | | गु | रु |
| | कु | मा | र | गु | प्त | |
| वि | मा | न | | ज | | डा |
| का | र | | | रा | ष्ट्री | य |
| स | | भा | र | त | | र |

।। तू ही निरंकार ।।

# वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
# प्रेमाचे पूल बांधत जाऊया



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

**महालक्ष्मी**

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्‌गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

